दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | बुधवार,दि.६ नोव्हेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक९०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊ!

## लाडकी बहीण योजनेवरुन ठाकरे-शिंदेंमध्ये जुंपली

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराला सुरुवात झाली आहे. लाडकी बहीण योजनेवरुन उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री शिंदेंमध्ये जुंपली. १५०० रुपये देता पण महागाईचं काय ?, देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊ म्हणत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला. त्यानंतर शिंदेंनीही पाटणच्या सभेतून प्रत्युत्तर दिलं. विधानसभेसाठी प्रचार सुरु झालाय आणि सुरुवातीलाच लाडकी बहीण योजनेवरुन उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात जुंपली आहे. लाडकी बहिण योजनेमुळं कोणाचं घर चालतं का ?, महागाईचं काय असा सवाल करत देवा भाऊ, दाढी भाऊ आणि जॅकेट भाऊ अशी टीका केली. उद्धव ठाकरे यांनी राधानगरीच केपी पाटलांसाठी सभा घेतली. मुख्यमंत्री शिंदे यांनी शंभूराज देसाईंच्या पाटणमधून ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं. टप्प्यात सावज आल्यावर करेक्ट कार्यक्रम केला, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. पान २ वर...



लाडकी बहीण योजना फक्त निवडणूकीच गाजर

हे भाऊ नसून जाऊ तिथे खाऊ आहेत

वेळ साधून करेक्ट कार्यक्रम करायचा असतो



### पंतप्रधानांनी देशाचा विचार करायचा असतो

भाजपच्या कटेंगे तो बटेंगे या कॅम्पेनवरुनही ठाकरेंनी ना तुटू देणारना लुटू देणार असा पलटवार केला. इकडे बारामतीच्या सभेतून शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मोर्चा वळवला. पंतप्रधानांनी देशाचा विचार करायचा असतो. मुख्यमंत्र्यांनी राज्याचा विचार करायचा असतो. तुम्ही देशाचे पंतप्रधान आणि एकाच राज्याचा विचार करतात. मोदी फक्त गुजरातचाच विचार करतात, मग पंतप्रधान कशाला मुख्यमंत्रीच व्हा, असा चिमटा पवारांनी काढला. प्रचार जेमतेम सुरु झालाय. २० तारखेला मतदान आहे. त्यामुळं जसजसा प्रचार शिगेला पोहोचले, टीकेचे रॉकेट फुटतील.

# वाळूच्या तिन हायवावर कारवाई!

## मोहीम: दोन कोटींचा मुद्देमाल जप्त

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील राक्षसभूवन परिसरातून चोरटी वाहतूक करूण त्यांची स्वत;च्या फायद्यासाठी वापर करण्यात येत असून अश्या तिन हायवा राक्षसभूवन परिसरात महसुल पथकांने पकडल्या असून या कार्यवाईत अंदाजे दोन कोंटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती गेवराईचे तहसिलदार संदिप खोमणे यांनी दिली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,(दि ४ नोंहेबर ) रोजी राक्षसभूवन परिसरातील गोदापात्रातून वाळूची हायवाव्दारे तस्करी करण्यात येत असल्याची माहिती गूप्त बातमीदाराने गेवराईच्या महसूल प्रमुखांना दिली तसेच त्यांनी सदर ठिकाणी आपल्या पथकाला संबंधीत पान २ वर...



# बुलेट ट्रेन प्रकल्पाचा पूल कोसळला

## दुर्घटना: तीन ठार तर ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकले

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी


गुजरातच्या आनंद जिल्ह्यात मोठी दुर्घटना घडली आहे. अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पातील बांधकाम सुरू असलेला एक पूल कोसळून अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दल व आनंद पोलिसांचं पथक घटनास्थळी दाखल झालं आणि त्यांनी बचावकार्य सुरू केलं. आतापर्यंत चार मजुरांना ढिगाऱ्याखालून सुखरूप बाहेर काढण्यात यश आलं असून त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्यावर सध्या उपचार चालू आहेत. तसेच या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू झाला आहे.

या अपघाताची माहिती मिळताच नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन पान २ वर...




# आयपीएल लिलावाची तारीख झाली जाहीर

## क्रीडा:दोन दिवस चालणार महालिलाव




मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

आयपीएल गव्हर्निंग काऊन्सिलने इंडियन प्रीमियर लीगच्या १८व्या हंगामापूर्वी आयपीएलच्या मेगा लिलावाच्या तारखांची अधिकृत घोषणा केली आहे. यावेळी खेळाडूंचा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. सौदी अरेबियामध्ये जेद्दा शहरात हा मेगा लिलाव होणार आहे. ३१ ऑक्टोबर रोजी, सर्व १० आयपीएल फ्रँचायझींनी त्यांच्या कायम ठेवलेल्या खेळाडूंच्या नावांची घोषणा केली होती, त्यामुळे यंदाच्या लिलावात अनेक मोठी नावे यावेळी लिलावाचा भाग असतील. यामध्ये सर्व संघांसह पान २ वर...

### उमेदवाराकडून विष प्राशन

नांदेड/पुण्यभूमी प्रतिनिधी




किनवट विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार गोविंद सांबन्ना जेठेवार यांनी मंगळवारी दुपारी विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. गोविंद जेठेवार हे किनवट तालुक्यातील स्थानिक मन्नेरवारलू समाजातून येणारे उमेदवार आहेत. जेठेवार यांना तातडीने गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तिथे प्रथमोचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी जेठेवार यांना आदिलाबाद येथे पाठविण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती कशी आहे, हे अजून कळाले नसून, विष प्राशन करण्याचे कारणही अजून समोर आलेले नाही. सोमवारी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी माघार न घेता निवडणूक लढविण्याचा निर्धार व्यक्त केला होता. सर्व प्रकियेनंतर त्यांना 'ऑटोरिक्षा' हे मतदानाचे चिन्ह प्राप्त झाले होते.

# कॅनडात हिंदू मंदिरावर हल्ला

## देशविदेश:पंतप्रधान मोदींकडून कडक निषेध

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

कॅनडाच्या ब्रेम्प्टन भागात रविवारी (४ नोव्हेंबर) हिंदू मंदिरावर खलिस्तानवाद्यांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेवर संताप व्यक्त होत असताना आता पंतप्रधान मोदींनीही याचा निषेध व्यक्त केला आहे. भारतीय उच्चाधिकारी मंदिराला भेट देण्यासाठी आले असताना सदर हल्ला करण्यात आला होता. पंतप्रधान मोदींनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, हिंदू मंदिरांवर जाणीवपूर्वक हल्ला केलेला असून राजनैतिक अधिकाऱ्यांना एकप्रकारे धमकाविण्याचा भ्याड प्रयत्न यातून झालेला आहे. या हल्ल्यानंतर आता कॅनडाने कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सांभाळण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.भारत आणि कॅनडा यांच्यात गेल्या काही दिवसांपासून तणावाचे संबंध निर्माण झाले आहेत.





खलिस्तानी अतिरेकी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमध्ये भारतीय गुप्तचर यंत्रणांचा हात असल्याचा आरोप कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी सप्टेंबर महिन्यात केला होता. हा आरोप करताना त्यांनी याबाबत ठोस असे पुरावे सादर केले नव्हते. भारताने त्यांच्या आरोपाचे जोरदार खंडन केले. या आरोपानंतर भारताने कॅनडातील सहा राजनैतिक अधिकाऱ्यांना माघारी बोलावून घेतले. तसेच पान २ वर...

**निर्णय** सर्वोच्च न्यायालयाचा योगी सरकारला झटका

# मदरसा शिक्षण मंडळ कायदा घटनात्मक

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायदा, २००४' रद्द ठरवण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार देत या कायद्याची घटनात्मक तरतूद कायम असल्याचा निर्वाळा दिला. यामुळे मार्च महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला अखेर स्थगिती मिळाली आहे. या कायद्यामुळे धर्मनिरपेक्ष तत्त्वाला तडा जात असल्याचे सांगून हा कायदा रद्द करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेले असता एप्रिल महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालाला अंतरिम स्थगिती दिली होती. यामुळे उत्तर प्रदेशमध्ये मदरशात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.मार्च महिन्यात उच्च न्यायालयाने सदर कायद्याला स्थगिती देऊन मदरशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये दाखल होण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. 'उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायद्यामुळे एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमासह धार्मिक शिक्षण देण्याचीही तरतूद आहे. या कायद्यानुसार मदरसा शिक्षण पान २ वर...



### पदवी देण्याचा अधिकार मात्र फेटाळला

सर्वोच्च न्यायालयाने कायदा घटनात्मक असल्याचा निर्वाळा दिला असला तरी फाजिल, कामिल सारख्या पदव्या देण्याचा अधिकार हा यूजीसी (विद्यापीठ अनुदान) कायद्याच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे. पदवी प्रदान करण्याचा अधिकारी वैध नाही, बाकी कायदा घटनात्मक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले.



## महाराष्ट्र मंदावू लागला

अप्रगतांच्या प्रगतीची सुरुवात केव्हा होते? जेव्हा अप्रगत आपली अप्रगतता मान्य करतात तेव्हा. एखाद्यास स्वतःची प्रगतिशून्यता मान्य नसेल तर त्याने प्रगती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. विद्यमान महाराष्ट्रास हे सत्य तंतोतंत लागू पडते. त्याची चर्चा करण्याआधी एक सत्य. महाराष्ट्र अर्थातच अप्रगत नाही. देशातील सर्वात प्रगतिशील राज्यांत महाराष्ट्राची गणना होते आणि मुंबई ही (तूर्त) देशाची आर्थिक राजधानी असून या प्रगतीचे इंजिन मानली जाते. तरीही महाराष्ट्रास या संपादकीयातील प्रारंभीचे विधान लागू होते. याचे कारण 'लोकसत्ता'ने अलीकडेच दिलेल्या वृत्तात आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेशी संबंधित तज्ज्ञांच्या अहवालावर हे वृत्त आधारित असून त्यात महाराष्ट्राच्या प्रगती– स्तब्धतेविषयीचा तपशील आहे. ऐन निवडणुकांच्या धामधुमीत हे वृत्त आल्याने साहजिकच त्यावर पक्षीय अभिनिवेशानुरूप भूमिका घेतल्या गेल्या. त्यातील सत्ताधारी पक्षाची भूमिका संपादकीयासमोरील पानावर वाचावयास मिळेल. ती त्या पक्षाच्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधीने लिहिलेली आहे. सदर मजकूर वाचल्यास अप्रगतांच्या प्रगतीबाबत या संपादकीयात नोंदविलेले निरीक्षण किती रास्त आहे हे लक्षात येईल. काही एक भरीव आणि विद्वत कार्यापेक्षा हे लोकप्रतिनिधी महाशय सध्याच्या 'व्हॉटअबाऊट्री' राजकीय संस्कृतीचे कसे आज्ञाधारक स्नातक आहेत हे यातून दिसेल; पण त्याच वेळी स्वतःच्या राजकीय भल्याची सांगड हे सद्गृहस्थ राज्याच्या प्रगतीशी घालत असल्याचेही लक्षात येईल. या अशांच्या 'आज इकडे उद्या तिकडे' वृत्तीमुळे हे असे लोकप्रतिनिधी आणि काही अ–शरीरी कंत्राटदार आदींची गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व प्रगती झाली असेलही. पण त्याने राज्याचे काहीएक भले झालेले नाही, हे अमान्य करता येणे अशक्य. आपले सर्व काही उत्तम चाललेले आहे आणि आपणास कोणाचे आव्हान नाही असे एकदा का स्वतःच स्वतःबाबत ठरवले की काय होते, ते महाराष्ट्र सरकारचे झालेले आहे.मुद्दा महाराष्ट्र किती मागास आहे हा अजिबात नाही. तो आहे राज्याच्या प्रगतीची गती किती मंदावली आणि त्याच काळात इतर राज्यांच्या– त्यातही विशेषतः गुजरातच्या– प्रगतीचा वेग किती वाढला हा आहे. तो मोजण्यास दोन घटक पुरेसे आहेत. एक म्हणजे देशाच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा असलेला वाटा आणि महाराष्ट्रातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न. या दोन्हीही आघाड्यांवर गुजरात आणि काही दक्षिणेतील राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची गती मंदावलेली आहे, हे नाकारता येणारे नाही. या मंदावलेल्या गतीनंतरही महाराष्ट्र अन्य राज्यांच्या तुलनेत पुढे आहे हे खरे. तथापि महाराष्ट्र आणि अन्य प्रगतिशील राज्ये यांच्यातील अंतर कमी होऊ लागले आहे हेही तितकेच खरे. आता यात कोणत्या काळात कोण मुख्यमंत्री होते, मुख्यमंत्रीपदी अमुक असताना इतकी गती मंदावली आणि तमुक आल्यावर तीत ०.५ टक्क्यांनी वाढ झाली, वगैरे तपशील निरर्थक. त्यातून फक्त स्वतःचे समाधान करता येईल. पण त्यामुळे जमिनीवरचे सत्य अजिबात बदलत नाही. हे भुईसत्य म्हणजे अर्थातच महाराष्ट्राचे मंदावणे. त्यावर भाष्य करताना राजकारणी मंडळी आपापल्या पक्षीय अभिनिवेशानुसार एकमेकांस दोष देतात आणि मंदगतीचे खापर एकमेकांवर फोडण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकीच्या काळात ही खापर फोडाफोडी अधिक जोमाने होते. हे लांबीने लहान असलेल्या पांघरुणाप्रमाणे. असे पांघरूण अंगावर घ्यावयाची वेळ आल्यास डोके झाकले तर पाय उघडे पडतात आणि पाय पांघरले गेल्यास डोक्यावर काही नाही, अशी परिस्थिती. तथापि ही वेळ आपल्यावर नक्की कशामुळे आली याचा विचार करण्यास या राजकीय मंडळींना अजिबात वेळ नाही आणि त्यात त्यांना स्वारस्यही नाही. त्यामुळे सत्तासोपानावरील पंत उतरले आणि राव चढले तरी राज्याच्या भागधेयात अजिबात सुधारणा होताना दिसत नाही.आणि म्हणून महाराष्ट्राचे मंदावणेदेखील तितकेच नैसर्गिक. प्रगतीच्या शिखरावर राहिलेला प्रदेश एका झटक्यात रस्त्यावर आला असे होत नाही. आधी त्या प्रदेशाची घसरगुंडी सुरू होते. सत्ताधारी वा त्यांचे बोलघेवडे प्रतिनिधी काहीही दावा करोत; महाराष्ट्राची अशी घसरण निश्चित सुरू झालेली आहे. तीकडे दुर्लक्ष करून केवळ राजकारणातच ही मंडळी अशीच मशगूल राहिली तर महाराष्ट्र पुरता जमिनीवर आल्याखेरीज राहणार नाही. आजचे मंदावणे उद्या मृत्यूसमान होण्याचा धोका असतो. तेव्हा हे वास्तव नाकारून उगाच नको त्याचे समर्थन करण्यात अर्थ नाही.

# संधीसाधूपणावर उपाय काय?



महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. त्या अनुषंगाने राजकारण करणारा प्रत्येक पक्ष कामाला लागला असून तिकीट नाकारलेले नेते पक्षनिष्ठा व विचार सोडून आमदारकीच्या तिकिटासाठी इकडून तिकडे पळापळ करू लागले आहेत. मोठ्या पक्षात तिकीट न मिळालेल्यांचा ओढा वंचित बहुजन आघाडी व बहुजन समाज पक्षाकडे असल्याचे दिसते. या पक्षांची पारंपरिक मतपेढी आणि स्वतःच्या प्रभावाखालील मतदारांची मते मिळवून निवडणुक जिंकू असे या आयारामांना वाटत असते. तर आपल्या पक्षाच्या मतांची टक्केवारी वाढेल हे गृहीत धरून हे पक्षही त्यांना तिकीट देतात. होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बसपा व वंचित आघाडीने २०० हून अधिक जागांवर उमेदवार दिले असून अन्य बहुजन आंबेडकरी पक्षसुद्धा स्वतंत्ररीत्या व आघाडी करून निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. यात नवीन असे काही नसून यशाची पर्वा न करता प्रत्येक निवडणुकीत हेच घडत असते. बहुजन आंबेडकरी राजकारणावरील ही पुटे गळून पडावीत याची सामान्य जनता अनेक वर्षांपासून वाट पाहते आहे, परंतु प्रत्यक्षात हे घडणे नाही, हेदेखील जनता जाणून आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडी व महायुती या दोन मुख्य दोन आघाड्या असून तिसरी आघाडी म्हणून वंचित बहुजन आघाडीचे नाव घेता येते. नुकत्याच झालेल्या लोकसभा २०२४ च्या निवडणुकांची आकडेवारी बघितल्यास व जनतेचा कल लोकसभेच्या निकालांप्रमाणेच राहिल्यास महाविकास आघाडी महाराष्ट्रात स्वबळावर सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत येऊ शकते. परंतु हे तथ्यसुद्धा खरे नाही कारण छत्तीसगड व हरियाणा येथील विधानसभा निवडणूक निकालापूर्वी सर्वत्र काँग्रेसच्या विजयाची खात्री व्यक्त केली जात असताना प्रत्यक्षात निकाल वेगळेच लागले. त्यामुळे महाराष्ट्राचे विधानसभा निकालसुद्धा धक्कादायक असू शकतात. हरियाणा विधानसभा २०२४ मध्ये बहुजन समाज पक्षाच्या मतांची टक्केवारी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत २.३२ टक्क्यांनी घसरली आहे. असे असताना महाराष्ट्रात बहुजन व आंबेडकरवादी पक्षांची स्थिती कशी असेल? मतदारांची भूमिका या पक्षांबरोबर जाण्याची असेल की त्यांच्या विरोधात मतदान करण्याची, हे समजून घेतले पाहिजे.महाराष्ट्रातील बहुजन मतदार व एलिट वर्ग हा आंबेडकरी नेत्यांच्या राजकारणाला व भूमिकांना कंटाळल्याचे दिसते. बहुजन आंबेडकरी नेते हे बहुजन सामाजाचे हित व त्यांचा विकास याचा विचार न करता त्याविरोधी भूमिका घेऊन केवळ स्वतःचे हित जपण्याला अधिक प्राधान्य देताना दिसतात. त्यामुळे आंबेडकरवादी अभिजन वर्ग हा तथाकथित नेत्यांच्या विरोधात भूमिका घेऊन कोणत्या पक्षाला मतदान केले पाहिजे याचे स्पष्ट आवाहन जनतेस करू लागला आहे. हा बदल का होत आहे? यावर आंबेडकरी नेत्यांनी चिंतन व मनन करण्याची गरज असताना पक्षकार्यकर्ते बुद्धिवंताना झोडण्याची व मारण्याची धमकी देत समाजमाध्यमांवर क्लेशदायक पोस्ट करतात. असे प्रकार चळवळीच्या वैचारिक गाभ्यावर आघात करणारे आहेत, याचे भानही त्यांना असल्याचे दिसत नाही.लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकामधील बहुजन आंबेडकरी राजकारणाची स्थिती फार गुंतागुंतीची आहे. महाराष्ट्रातील अनेक विधानसभा मतदार संघात बहुजन व फुले आंबेडकरी मतदारांची संख्या लक्षणीय असून अन्य कोणाला जिंकवायचे वा हरवायचे यावर त्यांचे व्होट हे निर्णायक ठरत असते. परंतु नेत्यांना वाया जाणाऱ्या मतांचा फायदा आपल्या विकासासाठी करून घेता येत नाही. हे एक दुर्दैवच आहे. समाजाच्या सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी केवळ राजकीय प्रतिनिधित्वाचीच गरज आहे की एकत्रित व्होटबँकेची यावर चर्चा करण्यास राजकीय नेते व बुद्धिवादी वर्ग तयार असल्याचे दिसत नाही. वास्तविक अशा मुद्द्यांना बगल देणे हे आत्मघात करण्यासारखे आहे. कारण आजच्या बदलत्या भारतात देवाण–घेवाणीच्या कुटनीतीतूनच आपले इप्सित साध्य करता येवू शकते. याचा अर्थ बहुजन आंबेडकरी पक्ष विसर्जित केले जावेत, असा नसून उलट राजकीय तडजोडीसाठी ते अधिक सक्षम केले जाणे गरजेचे आहे. त्यासाठी जनतेकडून एक पक्ष– एक संघटना हा फार्म्युला राबविण्याची गरज आहे.

महाराष्ट्रातील बहुजन–आंबेडकरी राजकारण आंदोलनाच्या स्वरूपात अत्यंत गतिमान दिसत असले तरी त्यामध्ये विखंडाची प्रक्रिया मोठी आहे. तरीही एकसंघ दृष्टिकोन, ठोस सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम समोर ठेवून वंचितांची संख्या लक्षात घेता महाराष्ट्रात एक सशक्त राजकीय पर्याय निर्माण झाला असता, परंतु स्वार्थी तत्वांनी ती संधी घालवली. महाराष्ट्रातील सामाजिक लोकसंख्येचे आकडे बघितल्यास बहुजन आंबेडकरी नावाने असंख्य पक्ष निर्माण होणे हे स्वार्थी व संधीसाधूपणाचे लक्षण आहे. बहुजन समाजात पसरलेल्या या संधीसाधूपणाच्या रोगाचे काय करायचे, यावर आता जनतेनेच औषध शोधले पाहिजे.

## पान एक वरून

**देवाभाऊ, दाढीभाऊ**

उद्धव ठाकरे म्हणाले की, 'हे भाऊ नाहीत हे जाऊ तिथे खाऊ आहेत. या योजनेमुळे कोणाचे घर चालतंय असं एका जरी व्यक्तीने सांगितले तरी मी महाविकासआघाडीला सांगेल की महायुतीच्या विरोधात एकही उमेदवार नको. कारण घरं सगळी सुखी आहेत. ही योजना राबवताय पण महागाई कितीये.''माझी आई काटकसर करायची हे मी पाहिलेय. यामध्ये जर आम्ही थोडा हातभार लावायला गेला तर तुम्ही त्याला रेवड्या म्हणतात. त्याला लाच म्हणतात. तुम्हाला लाज वाटली पाहिजेय ज्यांनी ज्यांनी यात खोडा घातलाय त्यांना कोल्हापुरी जोडा दाखवणार की नाही. असं एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.जेव्हा लोकांनी बाळासाहेबांचा विचार सोडले. पक्ष विकायला काढला. जेव्हा खच्चीकरण होऊ लागले. बाळासाहेबांचे धनुष्यबाण, विचार जेव्हा तोडून मोडून टाकले. वेळ साधून करेक्ट कार्यक्रम करायचा असतो. असंही शिंदे यांनी म्हटले आहे.

**वाळूच्या तिन हायवावर**

हायवा वाहने ताब्यात घेण्याच्या सुचना केल्या व राक्षसभूवन सिंमेट रस्त्यावरूण बीड व जालना परिसरात जात असतांना तिन हायवा महसूल पथकांने ताब्यात घेतल्या असून पुढील कार्यवाईसाठी ही वाहने बसडेपो याठिकाणी लावण्यात आल्या आहेत व या कार्यवाईत अंदाजे दोन कोंटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचे देखील महसूल प्रमुख संदिप खोमणे यांनी सांगितले आहे.

**बुलेट ट्रेन प्रकल्पाचा**

लिमिटेडचे अधिकारी देखील घटनास्थळी दाखल झाले आहेत. एनएचएसआरसीएल बुलेट ट्रेन प्रकल्पाचं काम करत आहे. एनएचएसआरसीएलने या घटनेनंतर एक निवेदन देखील जारी केलं आहे. यामध्ये म्हटलं आहे की आनंद येथील बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकामाच्या ठिकाणी काँक्रीटचे ब्लॉक कोसळले आहेत. या दुर्घटनेनंतर आम्ही मदत व बचावकार्य हाती घेतलं आहे. आनंद पोलील व अग्निशमन दलाचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी बचाव मोहीम सुरू केली आहे. आम्ही बचाव मोहीमेवर लक्ष ठेवून आहोत. बचाव पथकाला लागणारी सर्व प्रकारची मदत तातडीने पुरवली जाईल.

**आयपीएल लिलावाची**

एकूण २०४ खेळाडूंच्या जागा रिक्त आहेत. आयपीएलचा आगामी मेगा लिलाव खूपच रोमांचक होणार आहे, ज्यामध्ये ऋषभ पंत, केएल राहुल आणि श्रेयस अय्यर सारखे अनेक मोठे खेळाडू उतरणार आहेत, त्यामुळे त्यांच्यासाठी मोठ्या बोली लावल्या जातील हे निश्चित आहे. यावेळी सर्व १० फ्रँचायझींनी मिळून एकूण ४६ खेळाडूंना रिटेन केले आहे, ज्यांची नावे ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आली होती.२४ आणि २५ नोव्हेंबरला आयपीएल मेगा लिलाव आयोजित केला जात आहे, त्या दरम्यान भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर पर्थमध्ये पहिला कसोटी सामना खेळणार आहे आणि तिसऱ्या आणि चौथ्या दिवसाचा खेळ खेळवला जात असताना हा लिलाव होणार आहे. याआधी २०२४ मध्ये दुबईत आयपीएलचा मिनी लिलाव झाला होता.४ नोव्हेंबर २०२४ रोजी खझङ खेळाडूंची लिलावासाठीची नोंदणी अधिकृतपणे बंद झाली. एकूण १५७४ खेळाडूंनी (१,१६५ भारतीय आणि ४०९ विदेशी) मेगा ढ–ढ– खझङ २०२५ लिलावामध्ये सहभागी झाले आहेत. या खेळाडूंमध्ये ३२० कॅप्ड खेळाडू आहेत, १२२४ अनकॅप्ड खेळाडू तर ३० खेळाडू हे असोसिएट देशांचे आहेत.

**कॅनडात हिंदू मंदिरावर**

कॅनडाच्या भारतातील राजनैतिक अधिकाऱ्यांना देश सोडण्याच्या सूचना देण्यात आली.या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदाच कॅनडाबाबत विधान केले आहे. कॅनडामधील खलिस्तानी कट्टरपंथीयांना लक्ष्य करण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा हात असल्याचाही आरोपही पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्याने काही दिवसांपूर्वीच केला होता. भारताने कॅनडाच्या या दाव्याचा स्पष्ट शब्दात विरोध केला असून कॅनडाने केलेले आरोप धादांत खोटे आणि निराधार असल्याचे म्हटले आहे.खलिस्तानवाद्यांनी याआधीही भारतीय नागरिक, राजनैतिक अधिकाऱ्यांना लक्ष्य केलेले आहे. खलिस्तान्यांच्या कृतीवर पंतप्रधान मोदी यांनी पहिल्यांदाच भाष्य केले आहे. कॅनडातील खलिस्तानवाद्यांविरोधात भारत ठामपणे उभा असल्याचा संदेश यानिमित्ताने दिला गेला आहे.

**हिंदू मंदिरावर हल्ला कसा झाला? :** कॅनडामध्ये ब्रॅम्प्टनमधील हिंदू मंदिराबाहेर रविवारी खलिस्तानी निदर्शक आणि हिंदू धर्मीयांमध्ये संघर्ष उडाला. भारताच्या उच्चायुक्तालयाने हिंदू सभा मंदिराबरोबर संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमादरम्यान ही घटना घडली. ओटावा उच्चायुक्तालय आणि व्हॅनकूव्हर, टोरांटो येथील महावाणिज्य दूतावासांनी संयुक्तपणे छावणी उभारली होती. 'लोकल लाइफ सर्टिफिकेट' लाभार्थ्यांच्या सोयीसाठी हिंदू सभा मंदिराबरोबर एका कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. यावेळी भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांचा विरोध करण्यासाठी सीख फॉर जस्टीस संघटनेचे खलिस्तानवादी कार्यकर्ते तेथे जमले आणि त्यांनी हल्ला केला.

**मदरसा शिक्षण मंडळ कायदा** मंडळावर मुस्लीम सदस्यांची नियुक्ती केली जाते. कायद्याच्या कलम ९ मध्ये मंडळाचे काम कसे चालणार? याबाबत दिशानिर्देशन केले गेले आहे. अभ्यासक्रम कसा असेल? तसेच परीक्षा घेण्यासाठी मौलवींपासून ते फाजिलपर्यंत काय जबाबदाऱ्या आहेत? याची माहिती या कलमात आहे. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना उत्तर प्रदेश सरकारने सांगितले की, या कायद्याला घटनात्मक आधार आहे. यावर सरन्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने सांगितले की, मदरशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे ही चिंता असती तर मदरसा कायदा रद्द करणे हा त्यावरील उपाय नव्हता, तर विद्यार्थी दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यासाठी योग्य ते निर्देश देणे हा उपाय होता.

## पान सहा वरून

**केजमध्ये एकाच घरात**

राहीला नाही जे दोन चार कार्यकर्ते आहेत ते बाकी सारे खांद्यावर झेंडे घेऊन जय जय कार करायला राहिलेत का काय कारण खासदार रजनीताई,त्यांचे पती अशोक पाटील व मुलगा अदित्य पाटील व राहूल सोनवणे या पलीकडे काँग्रेस बीड जिल्ह्यात दिसतच नाही.

**लोकांच्या मनात**

राजेसाहेब देशमुख म्हणाले की, मी कमिशन एजंट नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी तन मन धनाने काम करणारा कार्यकर्ता आहे.परळी विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगिण विकासासाठी एकदा मला संधी द्यावी असे आवाहन परळी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी केले.ते बालाजी मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता संवाद बैठकीत बोलत होते.दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांची ९ नोव्हेंबर रोजी रोजी परळीतील मोंढा मैदान येथे दुपारी एक वाजता जाहीर सभा होणार आहे. या सभेला परळी विधानसभा मतदारसंघातून हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहनही त्यांनी केले. या बैठकीला काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर भाई, तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, एडवोकेट जीवनराव देशमुख, मुक्ताराम गवळी आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह शेकडो कार्यकर्ते , महिला उपस्थित होते.

## आ.सोळंकेंनी संपत्ती वाढविण्याचे काम केले– माधव निर्मळ



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघाची विद्यमान आमदार व माजी मंत्री प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघाचा विकास करण्यापेक्षा स्वतःची संपत्ती वाढविण्याचे काम केले अशी तोफ आमदार सोळंके यांचे नाव न घेता अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांनी येथील वैष्णवी मंगलकार्यालयात घेतलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात केले.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार माधव श निर्मळ यांनी माजलगाव शहरातील वैष्णवी मंगलकार्यालयात दि ०५ नोव्हेंबर मंगळवार रोजी परभणी चौक ते वैष्णवी मंगलकार्यालय रॅली काढत शक्ती प्रदर्शन करीत कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी विविध विषयावर बोलताना माधव निर्मळ म्हणाले की लोकशाहीचा गळा दाबण्याचे काम विद्यमान आमदार करत आहेत शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही शेतकऱ्याच्या उत्पादन खर्च निघत नाही काम झाले की लाथ मारण्याची यांची संस्कृती आहे असेही निर्मळ म्हणाले मला जर विधान भवनात पाठविण्याची संधी मिळाली तर माजलगाव मतदार संघ महाराष्ट्र मध्ये एक नंबर करेल सर्वांना सुखासारखे सरळ करतो त्यांच्या पात्रात भ्रष्टाचार नाही त्याला मतदान करा माझे पात्र निर्मळ आहे याप्रसंगी बऱ्याच वक्त्यांनी आपले समयोचित भाषण केले

## वीस वर्षांनी एकत्र येत वर्गमित्र मैत्रिणीचा गेट–टुगेदर

धारूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर शहरात असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेतील २००४ साली असलेल्या दहावी वर्गातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी एकत्र येत गेट–टुगेदर कार्यक्रमाच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा देत ५ नोव्हेंबर रोजी ज्या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवजे त्या शाळेला भेट देणे सध्या आपण काय करत आहोत कुठल्या क्षेत्रात आहोत याबाबत विचारात्मक चर्चासत्र पूर्ण करत स्नेहभोजनानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

वर्गमित्रांचे स्नेह मेळावे धारूर शहरात अनेक वेळा दिवाळी सणाच्या दरम्यान साजरे होत आहेत.यामध्ये २००४ या शैक्षणिक वर्षात धारूर शहरातील नावाजलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या दहावी वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी स्नेह मिलन सोहळावेचे आयोजन केले होते.या स्नेह मिलन सोळाव्यात विद्यार्थ्यांनी एकत्र येत ज्या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवले त्या शाळेला भेट देणे तसेच सध्या आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहोत त्या क्षेत्राची माहिती एकमेकांना सांगणे तसेच जुन्या आठवणीवर चर्चा करत या स्नेह मेळावा सोहळ्यासाठी पाच नोव्हेंबर हा दिवस निश्चित करत कार्यक्रम संपन्न केला. यावेळी वर्ग मित्र मैत्रिणींनी एकमेकांना आपले मोबाईल क्रमांक देऊन भविष्यात कायम एकमेकाच्या संपर्कात राहण्याचा शब्द देत सुखदुःखात सहभागी राहण्याचा शब्द दिला.स्नेह मिलन सोहळ्यातील दिवसभरांच्या कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाने हा कार्यक्रम संपन्न झाला.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## SHORT न्यूज

### 'त्या' पार्श्वभूमीवर त्यांचा निर्णय योग्य

**मुंबईः** मनोज जरांगे पाटील यांच्या या निर्णयावर शरद पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. मुंबई पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार यांनी याबाबत भाष्य केले. तिसऱ्या आघाडीचा कुणाशी काहीही संबंध नाही हा निर्णय त्यांचा आहे.

### कोल्हापुरात महाविकास आघाडीला धक्का

**'कोल्हापूर-** कोल्हापूर उत्तर मतदारसंघात मोठा ट्विस्ट आला आहे. याठिकाणी काँग्रेसने उमेदवारी दिलेल्या मधुरिमाराजे यांनी त्यांचा अर्ज मागे घेतला आहे.

### खासदार कुमारी शैलजा यांना मोठी जबाबदारी मिळणार

**सिरसाः** महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका पाहता काँग्रेस मोठे बदल करण्याच्या मनःस्थितीत असल्याचे दिसत आहे.

## SOCIALन्यूज

### काश्मिरी पंडितांशिवाय काश्मीर खोरे अपूर्ण

**'जम्मू :** काश्मीर खोऱ्यातून काश्मिरी पंडितांना मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करावे लागण्याचा खोऱ्यातील बहुसंख्य समुदायाला एकेदिवशी पश्चात्ताप होईल, असे वक्तव्य केंद्रीयमंत्री जितेंद्रसिंह यांनी आज केले.

### पाया पडल्यामुळे नितीश कुमार पुन्हा चर्चेत

**पाटनाः** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे नेहमी चर्चेत असतात. आता ते पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत आणि यावेळीचे कारण म्हणजे त्यांनी भाजपच्या माजी खासदार आरके सिन्हा यांचे चक्क पाय धरले. चित्रगुप्त मंदिराच्या जिर्णोद्ध राचे श्रेय सिन्हा यांनी नितीश कुमार यांना दिल्यानंतर त्यांनी ही कृती केली.

## इतिहासात आज

५ नोव्हेंबर
ठळक घटना / घडामोडी

- **१८१७:** इंग्रज व दुसरे बाजीराव यांच्यात खडकी येथे लढाई
- **१८२४:** अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात जगातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले.
- **१८४३:** विष्णूदास भावे यांनी 'सीता स्वयंवर' हे मराठीतील पहिले नाटक रंगमंचावर आणुन मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली
- **१८७२:** महिलांना मतदानाचा अधिकार नसताना अमेरिकेत सुसान अँथनी या महिलेने मतदान केल्यामुळे तिला १०० डॉलर दंड करण्यात आला.
- **१९४०:** फ्रँकलिन डी. रूझवेल्ट हे तिसऱ्यांदा निवडून आलेले. एकमेव राष्ट्रपती आहेत.
- **२००७:** गुगलने ने अँडरॉइड मोबाइल ऑपरेटिंग सिस्टमचे अनावरण केले.
- **२०१३:** भारताने मंगळ ऑर्बिटर मोहिमेची सुरूवात केली.
- **१८७०:** बंगालमधील विख्यात कायदेपंडित आणि स्वातंत्र्यसेनानी देशबंधू चित्तरंजन दास यांचा जन्म. , त्यांच्या स्मरणार्थ 'चित्तरंजन' हे शहर वसवण्यात आले.
- **२०११:** संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांचे निधन

# ४ हजार १४० उमेदवार मैदानात

## २ हजार ९३८ उमेदवारांची माघार

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मुंबईः** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आज दुपारी ३ वाजता उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत संपली. त्यामुळे आता कोणकोणामध्ये लढत होणार हे स्पष्ट झाले आहे. तर नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवसापर्यंत राज्यात एकूण ४ हजार १४० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. नामनिर्देशन पत्र वैध ठरलेल्या एकूण ७ हजार ७८ उमेदवारांपैकी आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत २ हजार ९३८ उमेदवारांची माघार घेतली होती.

दोन आघाड्या आणि सहा पक्ष विधानसभा निवडणुकीत असल्याने बंडखोरी मोठ्या प्रमाणात होईल अशी शक्यता व्यक्त केली होती. त्यानुसार यंदा अनेक पक्षांमध्ये बंडखोरी झाली. कित्येकांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला होता. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून महाविकास आणि महायुतीकडून बंडोबांना शांत करण्यासाठी प्रयत्न सुरू होते. दरम्यान, आज सर्वच पक्षातील अनेक बंडखोरांनी उमेदवारी मागे घेतली असली तरी काही बंडखोर अजूनही मैदानात आहेत. त्यामुळे प्रस्थापित राजकीय पक्षांचे गणित नक्कीच बिघडू शकते.

राज्यात निर्माण झालेल्या गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीमध्ये यावेळच्या विधानसभा निवडणुकीत बंडखोरांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. बंडखोरांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घ्यावेत यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत महायुती आणि महाविकास आघाडीमधील नेत्यांकडून त्यांची मनधरणी करण्यात आली. काही ठिकाणी यश आले मात्र अनेक ठिकाणी बंडखोरांनी आपले उमेदवारी अर्ज कायम ठेवले आहेत. त्यामुळे आता अनेक विधानसभा मतदारसंघात तिरंगी, चौरंगी लढत होणार असून, याचा मोठा फटका या अधिकृत उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. बंडखोरांमुळे महायुती आणि महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढली आहे.

बारामती विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी नऊ जणांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत.

### बरेच बंडखोरही रिंगणात



कोल्हापूर जिल्ह्यात निवडणुकीच्या आधीच काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभेच्या काँग्रेसच्या उमेदवार मधुरिमाराजे यांनी त्यांचा अर्ज मागे घेतल्याने काँग्रेसकडे उमेदवारच राहिला नाही. काँग्रेसचे बंडखोर उमेदवार राजेश लाटकर यांनी त्यांचा अर्ज मागे घ्यायला नकार दिल्यानंतर मधुरिमाराजे यांनी त्यांचा अर्ज मागे घेतल्याची चर्चा आहे.

# उत्तराखंडमध्ये अपघातात 36 ठार



## प्रवासी बस दरीत कोसळली

वृत्तसंस्था

**अल्मोडाः** उत्तराखंडमध्ये सोमवारी सकाळी एक प्रवासी बस दरीत कोसळली. यात ३६ प्रवासी ठार झाले. तीन जखमींना एअरलिफ्ट करून ऋषिकेश एम्स येथे आणण्यात आले. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार रेस्क्यू अभियान पूर्ण झाले आहे. या बसमध्ये ४२ प्रवासी होते. उत्तराखंडच्या अल्मोडा येथे सोमवारी सकाळी हा भीषण अपघात झाला.

अल्मोडाच्या मार्चुला जवळ हा भीषण अपघात झाला. बस नैनीडांडाच्या किनाथ येथून प्रवाशांना घेऊन चालली होती. बसला रामनगरला जायचे होते. बस सारड बँड येथे नदीत कोसळली. डोंगराळ भागात हा अपघात झाला. या अपघातात बसचे पूर्णपणे नुकसान झाले. स्थानिकांनी लगेच पोलिसांना या घटनेची माहिती दिली. अपघाताची माहिती मिळताच एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या टिमला घटनास्थळी बोलवण्यात आलेय. जखमींना बाहेर काढून रुग्णालयात पोहोचवण्यात आलं.



### हवाई दलाचे मिग-२९ विमान कोसळले

**आग्राः** सोमवारी आग्रा येथे हवाई दलाचे मिग-२९ विमान कोसळले. टेक ऑफ करत असताना विमानाला आग लागली. क्षणार्धात विमान आगीचा गोळा बनून मैदानात कोसळले. विमान जमिनीवर पडताच स्फोटही होऊ लागले.

# ट्रम्प - हॅरिस यांच्यात काँटे की टक्कर

## आज राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टनः** अमेरिकेत उद्या राष्ट्राध्यक्ष निवडणूक होणार आहे. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सुरुवातीपासूनच आघाडीवर होते.

सध्याचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांची उमेदवारी बदलून ती भारतीय वंशाच्या उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांना देण्यात आली आणि ट्रम्प यांना टक्कर मिळू लागली. सध्याच्या परिस्थितीनुसारच्या सर्व्हेमध्ये ट्रम्प आणि हॅरिस या दोघांचीही लोकप्रियता ४८ टक्क्यांवर आहे. यामुळे ही निवडणूक घासाघाशीत सुटण्याची शक्यता आहे.

५ नोव्हेंबरला निवडणूक आहे, अशातच रिपब्लिकन आणि डेमोक्रेटीक पार्टीमध्ये काँटे की टक्कर पाहायला मिळत आहे. पेनसिल्व्हेनिया, मिशिगन, विस्कॉन्सिन; पश्चिमेला नेवाडा आणि ॲरिझोना आणि दक्षिण - जॉर्जिया आणि उत्तर कॅरोलिना या राज्यांत कोणत्याही क्षणी मतदान पालटू शकते अशी परिस्थिती आहे.

# मनोज जरांगेंची निवडणुकीतून माघार

- मित्र पक्षाची यादी न आल्याचे दिले कारण
- मराठा उमेदवारांना अर्ज मागे घेण्याचे आवाहन



देशोन्नती वृत्तसंकलन...

## म्हणाले, 'उमेदवारी नाही, कोणालाही पाडा'

तुमच्या मतदार संघात तुम्हाला ज्याला मदत करायची त्याच्याकडून 'मी तुमच्या मागण्यांशी सहमत आहे', असे लिहून घ्या, असे आवाहन केले. आम्ही निवडणुकीत असलो तरी समोरच्याचा खेळ खलास आणि नसलो तरी खेळ खलास, असे म्हणत विरोधकांना जरांगे यांनी इशारा दिला. तसेच आता गणिमी काव्याने समाजाची ताकद दाखवू, असेही ते म्हणाले.

**वडिगोद्री :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल कोण-कोणत्या मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवणार, याची माहिती मनोज जरांगे यांनी दिली होती. तसेच, कोणत्या जागेवरील उमेदवार पाडण्याचे याबाबतही सांगितले होते. मात्र, आता जरांगे यांनी मोठा निर्णय घेत विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे.

मित्रपक्षाची यादी आलेली नाही. त्यामुळे एका जातीवर निवडणूक लढणे आणि जिंकणे शक्य नाही. त्यामुळे समाज बांधवांनी आपापले अर्ज काढून घ्यावेत. उमेदवार द्यायचा नाही, आता कोणाला पाडायचे ते पाडा आणि कोणाला आणायचे ते आणा, असे आवाहन जरांगे यांनी सोमवारी केले.

यादी आली नसली तरी ते मित्रपक्ष आपलेच आहेत. त्यामुळे जरांगे पाटील यांनी समाजाच्या जिवावर निवडणूक लढविता येत नाही. महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो कोणी आमच्या कामाचे नाही. त्यामुळे कोणाला पाडा आणि कोणाला आणा म्हणण्यात अर्थ नाही.

# पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली

## केंद्रीय निवडणूक आयोगाचे आदेश

वृत्तसंस्था...

**मुंबईः** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रश्मी शुक्ला यांच्या बदलीची मागणी काँग्रेसने केली होती. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी रश्मी शुक्ला यांची तातडीने



बदली करावी, अशी मागणी नाना पटोले यांनी पत्र लिहित केंद्रीय निवडणूक आयोगाला केली होती. त्यानंतर आता निवडणूक आयोगाने या तक्रारीची दखल घेत रश्मी शुक्ला यांच्या बदलीचे आदेश काढले आहेत.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर होताच तब्बल २८ पोलिसांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. यात १५ अधिकारी हे मुंबईतील होते. तसेच राज्यभरातील ३०० हून अधिक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या होत्या. यात रश्मी शुक्ला यांची पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधकांचे फोन टॅप केल्याचा आरोप आहे.

### काँग्रेसने केली होती बदलीची मागणी

यामुळे २० नोव्हेंबरपूर्वी त्यांची बदली करावी. रश्मी शुक्ला जोपर्यंत या पदावर आहेत, तोपर्यंत राज्यात निःपक्ष निवडणूक होणे अवघड आहे, असा गंभीर आरोपही नाना पटोले यांनी केला होता. याबद्दल नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला पत्रदेखील पाठवले होते.

# यूपी, पंजाब, केरळमध्ये पोटनिवडणुकीची तारीख बदलली

## 14 जागांसाठी 13 ऐवजी आता 20 नोव्हेंबरला मतदान

### सणांमुळे वेळापत्रक बदलले

वृत्तसंस्था

**नवी दिल्लीः** उत्तर प्रदेश, पंजाब आणि केरळमध्ये होणाऱ्या विधानसभा पोटनिवडणुकीच्या तारखा बदलल्या आहेत. निवडणूक आयोगाने सोमवारी सांगितले की, तीन राज्यांतील १४ विधानसभा जागांसाठी आता १३ नोव्हेंबरऐवजी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. २३ नोव्हेंबरलाच निकाल लागेल.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, आता उत्तर प्रदेशातील ९, पंजाबमधील ४ आणि केरळमधील १ विधानसभा जागांवर २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. भाजप, काँग्रेस, आरएलडी आणि बसपाच्या मागणीनुसार तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.

या पक्षांनी सांगितले की १५ नोव्हेंबरला कार्तिक पौर्णिमा आणि गुरुनानक देवजींचे प्रकाश पर्व आहे. तर केरळमध्ये १३ ते १५ नोव्हेंबरदरम्यान कलापथी रास्तोलसेवाम साजरा केला जाणार आहे. त्यामुळे मतदानावर परिणाम झाला असता. २० नोव्हेंबरलाच महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणूक होत आहे. याशिवाय महाराष्ट्रातील नांदेड लोकसभा आणि उत्तराखंडच्या केदारनाथ विधानसभेच्या जागेवर २० नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक होणार आहे.

# राज्यात 9.7 कोटी मतदार; पुण्यात सर्वाधिक

## पाच जिल्ह्यांमध्ये महिला मतदारांची संख्या अधिक

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे.

पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत.

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंद आहे ज्यामध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला आणि ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

# अजितदादांच्या 8 उमेदवारांविरोधात शिवसेना-भाजपचेच बंडखोर

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मुंबईः** विधानसभा निवडणूक आता अवघ्या काही दिवसांवर आली आहे. येत्या २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी दाखल केलेले अर्ज मागे घेण्यासाठी आज ४ नोव्हेंबर हा अखेरचा दिवस होता.

जागावाटप झाल्यानंतरही महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये अनेक ठिकाणी तिढा कायम होता. इच्छुक असूनही उमेदवारी न मिळालेले अनेक उमेदवार बंडखोरी करत अपक्ष मैदानात उतरलेत. त्यानंतर सर्व पक्षांच्या नेत्यांकडून मनधरणीचे प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर काही ठिकाणी बंड शमवण्यात नेते यशस्वी झालेत. तर काही ठिकाणी अजूनही तिढा कायम आहे.

महायुतीसोबत असलेल्या अजित पवार यांच्यासमोर यंदाच्या विधानसभा निवडणुकीत अनेक आव्हानं असणार आहे. वेगळी भूमिका घेऊन शरद पवार यांच्यापासून वेगळे झालेले अजित पवार यांच्यासमोर स्वतःला सिद्ध करण्याचं मोठं आव्हान असणार आहे. तर दुसरीकडे महायुतीमधील अंतर्गत कलहांना देखील त्यांना सामोरं जावं लागणार आहे.

# बंदीतही दिल्लीत फटाके कसे फुटले?

वृत्तसंस्था

**नवी दिल्लीः** दिवाळीच्या काळात दिल्लीत न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकार आणि पोलिसांना फटकारले आहे. स्वतःहून कारवाई करत न्यायालयाने म्हटले की, बंदी असतानाही फटाके कसे फुटले. पुढील वर्षी दिवाळीत फटाक्यांवर बंदी घालणाऱ्या आदेशांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी काहीतरी केले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

मीडिया रिपोर्ट्सचा हवाला देत, न्यायमूर्ती अभय एस. ओका आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने सांगितले की, बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कॅम्पस सील करण्यासारख्या कठोर कारवाईची गरज आहे.

- सुनावणीदरम्यान ॲमिकस क्युरी म्हणाले की, दिवाळीच्या काळात शेतात आग लागण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात होतात. दिवाळीच्या एक दिवस आधी १६० शेतांना आग लागली होती, तर दिवाळीच्या दिवशी ही संख्या ६०५ वर पोहोचली. प्रदूषणाची टक्केवारी १० वरून ३० पर्यंत वाढली होती.

## सर्वोच्च न्यायालयाची सरकार व पोलिसांना विचारणा

खंडपीठाने पंजाब आणि हरियाणा सरकारांना ऑक्टोबरच्या शेवटच्या १० दिवसांमध्ये शेतांना आग लागणे आणि शेतातील पराली जाळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबद्दल १४ नोव्हेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे.

या प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकार आणि पोलीस आयुक्तांकडून फटाक्यांवर बंदी लागू करण्यासाठी काय पावले उचलली आहेत यावर आठवडाभरात उत्तर मागितले आहे. पुढील सुनावणी १४ नोव्हेंबरला होणार आहे.

दिवाळीत फटाक्यांच्या आतषबाजीमुळे प्रदूषणाने शुक्रवारी सकाळी दिल्ली झाकोळली होती. दिल्लीतील हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) धोक्याच्या पातळीवर, ४००च्या उंबरठ्यावर पोहोचला. दिल्लीत दिवसभर धुरक्याचा पडदा राहिल्याने नागरिकांना श्वास घेणेही अवघड बनले.

उत्तर भारतात दोन दिवस साजऱ्या होणाऱ्या दिवाळीच्या

### बंदी का नाही घातली?

पहिल्या रात्री, गुरुवारी दिल्लीतील अनेक भागांत फटाक्यांची आतषबाजी झाली. दिल्लीत फटाक्यांवर कायदेशीर बंदी असतानाही शहरात मोठ्या प्रमाणात त्याचे उल्लंघन झाले. त्यानंतर शुक्रवारी दिवसभर 'एक्यूआय' 'अत्यंत खराब' पातळीवर घसरला. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) आणि भारतीय हवामान विभाग (आयएमडी) यांसारख्या प्रदूषण निरीक्षण संस्थांनुसार, गेल्या २४ तासांतही दिल्लीत 'एक्यूआय' 'अत्यंत खराब' पातळीवरच आहे.

**सुविचार** - प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नाचा आनंद अधिक असतो.

## शेवटच्या दिवसाचे नाट्य....!

सोमवार हा विधानसभा निवडणुकीसाठी दाखल अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. राज्यात लढतीत असलेल्या सहा प्रमुख पक्षांमध्ये अनेक ठिकाणी अधिकृत उमेदवाराच्या विरोधात अर्ज दाखल करणाऱ्यांचे प्रमाण बरेच मोठे होते. त्यापैकी काहींची समजूत घालण्यात पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाला यश आले होते; परंतु अनेकांनी आपले उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने ऐन दिवाळीत पक्ष नेतृत्वाला धावपळ करावी लागली. अनेकांनी अगदी शेवटच्या दिवसापर्यंत आपल्या नेत्यांना झुलवत ठेवले; परंतु त्यापैकी बऱ्याच जणांनी शेवटी पक्ष नेतृत्वाचा मान राखत किंवा पक्ष नेतृत्वाने दिलेल्या आश्वासनांवर विसंबून आपली उमेदवारी मागे घेतली. काही ठिकाणी मात्र बंडखोरांनी आपला हेका कायम राखल्याने त्या त्या मतदारसंघात संबंधित पक्षाला काही प्रमाणात नुकसान होऊ शकते. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक ठिकाणी नाट्यमय घडामोडी घडल्या. कोल्हापूर उत्तरमध्ये काँग्रेसने सुरुवातीला राजेश लाटकर यांना उमेदवारी घोषित केली होती; परंतु स्थानिक नगरसेवकांच्या विरोधामुळे त्यांच्याऐवजी मधुरिमाराजे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली. या निर्णयामुळे नाराज झालेल्या राजेश लाटकर यांनी अपक्ष म्हणून आपली उमेदवारी कायम ठेवली. त्यांची समजूत काढण्याचे सगळे प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर अगदी शेवटच्या क्षणी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे यांनीच आपली उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे कोल्हापूर उत्तर मतदारसंघात आता काँग्रेसचा कोणताही अधिकृत उमेदवार नाही. परिणामी राजेश लाटकर यांनाच पुन्हा काँग्रेस पाठिंबा देईल हे उघड आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारानेच अर्ज मागे घेण्याची ही घटना तशी अपूर्वच म्हणावी लागेल. त्यासोबतच गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या माहिम मतदारसंघात काय होते, याचीही उत्सुकता होती. भाजप आणि मनसेकडून शिंदे सेनेचे उमेदवार सदा सरवणकर यांच्यावर उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव आणण्यात आला होता. शेवटच्या दिवशी सदा सरवणकर यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यांना थेट राज ठाकरेंशी चर्चा करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार सदा सरवणकर यांचे पूत्र समाधान आणि इतर काही कार्यकर्ते राज ठाकरेंच्या भेटीसाठी त्यांच्या निवासस्थानी पोहचले; परंतु राज ठाकरेंनी त्यांना भेट नाकारली. तुम्हाला काय करायचे ते करा, असा निरोप त्यांनी दिला. त्यामुळे सदा सरवणकरांनी आपली उमेदवारी कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. पुढच्या एक-दोन दिवसात काही नाट्यमय घडामोडी घडल्या नाही तर माहिममध्ये अतिशय उत्कंठावर्धक लढत पाहायला मिळू शकते. माहिममध्ये शिंदे सेनेने माघार न घेतल्याचा परिणाम मुंबईतील इतर बारा जागांवर पडू शकतो. या बारा जागांवर शिंदे सेनेचे उमेदवार उभे आहेत आणि तिथे मनसेनेही आपले उमेदवार दिले आहेत. माहिमचा राग मनात ठेवून या बारा ठिकाणी मनसेने त्वेषाने निवडणूक लढविली तर शिंदे सेनेला या बारा जागांवर मोठ्या आव्हानाला तोंड द्यावे लागू शकते. त्याचवेळी तिकडे भाजपचे बोरिवलीतील हेविवेट बंडखोर गोपाळ शेट्टींनी मात्र पक्षासाठी आपली बंडखोरी मागे घेत असल्याचे घोषित केले. या सगळ्या गदारोळात मनोज जरांगे कोणता निर्णय घेतात याकडेही सगळ्यांचे लक्ष लागले होते. मराठवाड्यातील पाच-सात मतदारसंघात त्यांनी आपले उमेदवार उभे करण्याचे घोषितही केले होते, अन्य मतदारसंघातील उमेदवारांबाबत सोमवार सकाळपर्यंत ते निर्णय घेणार होते; परंतु अखेर त्यांनी या निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली. जरांगेंचे उमेदवार आता लढतीत नसतील; परंतु त्यांची राजकीय भूमिका पाहता त्यांच्या या निर्णयाचा फटका महायुतीला बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. केजमध्ये बंडखोरी करणाऱ्या भाजपच्या माजी आमदारांनी आपला उमेदवारी अर्ज तर मागे घेतला; परंतु आपला पाठिंबा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला घोषित केला. त्यामुळे तिथल्या भाजप उमेदवाराची डोकेदुखी वाढल्याचे दिसते. अकोल्यात काँग्रेसच्या विरोधात बंडखोरी करीत वंचितकडून उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराने शेवटच्या क्षणी निवडणूक रिंगणातून माघार घेतली. वंचितसाठी हा मोठा धक्का मानल्या जात आहे. एकूणच अखेरच्या दिवशी बऱ्याच नाट्यमय घडामोडी घडल्या, अनेक बंडखोरांनी शेवटी आपल्या तलवारी म्यान केल्या; परंतु काही ठिकाणी बंडखोरांची उपस्थिती कायम राहिल्याने नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे.

## मोठी बदली.....!

विरोधकांनी सातत्याने आक्षेप नोंदविल्यानंतर अखेर निवडणूक आयोगाने तात्काळ प्रभावाने राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या बदलीचे आदेश दिले. त्यांचा प्रभार तात्पुरत्या स्वरूपात विवेक फणसाळकर या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे देण्यात आला आहे. रश्मी शुक्ला या आधीच्या सरकारच्या कार्यकाळात म्हणजे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते त्या काळात राज्याच्या गुप्तवार्ता विभागाच्या प्रमुख होत्या आणि त्याच काळात त्यांनी विरोधी पक्षनेत्यांचे फोन टॅप केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता. महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांच्यावर गुन्हे देखील दाखल करण्यात आले होते; परंतु राज्यात पुन्हा एकदा नाट्यमय घडामोडी घडल्या शिंदे सरकार सत्तेत आले आणि या सरकारने त्यांच्या विरोधातील सगळे गुन्हे मागे घेतले. एवढेच नव्हे तर त्यांना दोन वर्षांची मुदतवाढ देत त्यांची पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या या नियुक्ती विरोधात राज्याच्या विरोधी पक्षांनी सातत्याने आक्षेप घेतले होते. निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर विरोधकांनी निवडणूक आयोगाची भेट घेत रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटविण्याची मागणी देखील केली होती. या आधी झारखंड आणि प. बंगालमध्ये निवडणूक कार्यक्रम घोषित होताच तिथल्या पोलीस महासंचालकांना तातडीने हटविण्यात आले होते, परंतु महाराष्ट्रात या कारवाईला विलंब झाला. अखेर विरोधकांच्या दबावामुळे निवडणूक आयोगाने त्यांची बदली केली आहे. रश्मी शुक्ला यांची कारकिर्द तशी चांगलीच वादग्रस्त आहे. खरे तर अशा अधिकाऱ्यांना किमान निवडणुकीच्या काळात तरी इतके मोठे आणि महत्त्वाचे पद दिले जाऊ नये, असे संकेत आहेत; परंतु देवेंद्र फडणवीस यांच्या खास मर्जीतील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रश्मी शुक्लांना महाराष्ट्र सरकारने बाकायदा मुदतवाढ देऊन राज्याचे पोलीस महासंचालक बनविले. त्यांच्या या नियुक्तीमुळे राज्यात निःपक्ष वातावरणात निवडणूक पार पडण्यास बाधा येऊ शकते, ही भूमिका विरोधकांनी घेतली होती. त्यासंदर्भात पहिले पत्र २४ सप्टेंबरलाच निवडणूक आयोगाकडे देण्यात आले, अखेर त्यावर निर्णय घेण्यास जवळपास दीड महिन्याचा कालावधी निवडणूक आयोगाला लागला, पण अखेर ही मोठी बदली झाली, हीदेखील मोठी बातमी आहे.

### स्थित्यंतर

# मंदावली अर्थव्यवस्था...




राही भिडे

9867521049


दिवाळीत कितीही तंगी असली, तरी लोक खर्च करतात; परंतु लोकांना संकटाची जाणीव झाली, की खर्चासाठी हात आखडता घेतला जातो. मध्यम वर्ग तसेच गरीब खरेदी कमी करतात. देशात एक घटक असा आहे, की त्याला महागाईसह कोणत्याही गोष्टीचा फरक पडत नाही. यंदा दिवाळीत चार लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल, अशी अपेक्षा होती; परंतु ती प्रत्यक्षात झाली नाही.

अनेक निर्देशकांनुसार भारतीय अर्थव्यवस्था मंदावली आहे. अनेक क्षेत्रांमध्ये क्रियाकलाप कमी झाला आहे. स्वस्त कारची मागणी कमी होत आहे. प्रमुख मूलभूत उद्योगांची वाढही मंद आहे. या सर्व कारणांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असून चिंतेची परिस्थिती निर्माण झाली आहे. जगात सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या भारताच्या अर्थव्यवस्थेची धांदल उडताना दिसत आहे. अनेक प्रमुख संकेतक आणि अहवाल या दिशेने निर्देश करत आहेत. २०४७ पर्यंत विकसित होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे अजिबात सुचिन्ह नाही. स्वस्त गाड्यांमध्ये घट, सप्टेंबरमध्ये प्रमुख मूलभूत उद्योगांच्या वाढीतील मंदी, नोकरीच्या पगारात वाढ नसणे आणि शहरांमधील खरेदीमध्ये घट ही सर्व कारणे चांगले लक्षण नाही. अलीकडेच जपानी ब्रोकरेज कंपनी 'नोमुरा'ने म्हटले आहे, की भारतीय अर्थव्यवस्थेने चक्रीय वाढीच्या मंदीच्या काळात प्रवेश केला आहे. ७.२ टक्के जीडीपी वाढीचा भारतीय रिझर्व्ह बँकेचा अंदाज खूपच आशादायी आहे. 'नोमुरा'ने आर्थिक वर्ष २०२४-२५ आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जीडीपी वाढीमध्ये घट होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. शहरी मागणीतील कमजोरी आणि ग्राहकांच्या खर्चात घट सुरूच आहे. 'नोमुरा'ने सांगितले, की शहरी उपभोगाचे निर्देशक कमकुवत झाले आहेत. त्यात प्रवासी वाहनांच्या विक्रीत घट, विमान प्रवासी वाहतुकीत घट आणि गृहोपयोगी वस्तूंच्या कंपन्यांकडून कमकुवत शहरी मागणी यांचा उल्लेख करण्यात आला आहे. कंपन्या त्यांच्या पगाराची देयके कमी करत आहेत. 'मारुती सुझुकी इंडिया'चे अध्यक्ष आरसी भार्गव यांनीही स्वस्त कारच्या विक्रीत घट झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. एकेकाळी एकूण विक्रीत या कारचा वाटा ८० टक्के होता. आता त्यात सातत्याने घट होत आहे. याचे कारण म्हणजे लोकांचे डिस्पोजेबल उत्पन्न कमी आहे. आठ प्रमुख मूलभूत उद्योगांची वाढ मंदावली आहे. सप्टेंबर महिन्यात देशातील आठ प्रमुख मूलभूत उद्योगांची वाढ दोन टक्क्यांवर घसरली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, मूलभूत उद्योगांचे उत्पादन ऑगस्ट २०२४ मध्ये वार्षिक आधारावर १.६ टक्क्यांनी घसरले. सप्टेंबर महिन्यात आठ प्रमुख क्षेत्रांपैकी कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि ऊर्जा क्षेत्राने नकारात्मक वाढ नोंदवली. आठ मूलभूत उद्योगांमध्ये कोळसा, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट आणि ऊर्जा क्षेत्रांचा समावेश होतो. औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी) मध्ये मूलभूत उद्योगांना ४०.२७ टक्के वेटेज आहे.

भारतातील कामगार वर्ग पूर्वीपेक्षा जास्त कर्जात बुडत आहे. गेल्या दोन वर्षांत कर्ज घेणाऱ्यांची संख्या आणखी वाढली आहे. एका सर्वेक्षणाच्या अहवालानुसार, बहुतेक नोकरदार लोकांवर २५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा आकडाही वाढला आहे. मेट्रो शहरांमध्ये कर्जाशिवाय राहणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. नोकरदार महिलांचे बहुतांश कर्ज हे गृहकर्जामुळे आहे. केवळ १३.४ टक्के लोक कर्जाशिवाय जगत आहेत. 'बँकबाजार'च्या सर्वेक्षणानुसार केवळ १३.४ टक्के कामगार कर्जाशिवाय जगत आहेत. २०२२ मध्ये हा आकडा १९ टक्के होता. गेल्या दोन वर्षांत अनेक नोकरदारांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारची कर्जे घेतल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे. नोकरदार लोकांनी जास्तीत जास्त २५ लाख रुपयांपर्यंत कर्ज घेतले आहे. असे कर्ज घेणाऱ्यांची संख्या आता ९१.२ टक्क्यांवर पोहोचली आहे. गेल्या वर्षीपर्यंत हा आकडा ८८ टक्के होता. या सर्वेक्षणात ६ मेट्रो शहरे आणि द्वितीय श्रेणीत १८ शहरांतील लोकांचा समावेश करण्यात आला होता. यापैकी ४० टक्के महिला होत्या. या सर्वांचा पगार किमान ३० हजार रुपये होता. घर आणि गाडीशिवाय ते आंतरराष्ट्रीय प्रवासावरही खर्च करत आहेत. सर्वेक्षणानुसार, कर्ज आणि क्रेडिट कार्ड यांसारखी आर्थिक उत्पादने बहुतेक काम करणारे लोक वापरतात. सर्वेक्षणानुसार, भारतीय कर्मचाऱ्यांमध्ये घर खरेदीला प्रथम क्रमांकाचे प्राधान्य आहे. यानंतर त्याला त्याचे आरोग्य, नातेसंबंध, प्रसिद्धी आणि प्रगतीवर पैसे खर्च करायचे आहेत. नोकरी करणारे लोक प्रवास आणि निवृत्तीचा इतक्या लवकर विचार करत नाहीत. स्वतःचा रोजगार करण्याची इच्छा तरुणांमध्येही वाढली आहे. त्याला स्वतःचा स्टार्टअप सुरू करायचा आहे. या बाबतीत महिला पुढे आहेत. पूर्व भारतात काम करणाऱ्या लोकांना शैक्षणिक कर्ज, दक्षिण भारतात कार कर्ज आणि उत्तर आणि पश्चिम भारतात गृह कर्ज घ्यायचे आहे. अलीकडच्या आकडेवारीनुसार देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत चिंता वाढत आहे.

अलीकडच्या वर्षांत घरगुती बचतदेखील दशकाच्या नीचांकी पातळीवर गेली आहे, जी आर्थिक सुरक्षा आणि समृद्धीसाठी चिंतेची बाब आहे. या परिस्थितीचा परिणाम मध्यमवर्गीयांच्या आर्थिक नियोजनावर आणि भविष्यातील गुंतवणूक क्षमतेवर होत आहे. हीच परिस्थिती कायम राहिल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. या संदर्भात सरकारने योग्य धोरणे आखून या समस्येवर तोडगा काढण्याची गरज आहे, जेणेकरून आर्थिक स्थिती सुधारून मध्यमवर्गीयांना दिलासा मिळू शकेल.

कोरोना महामारीनंतरचा ऑक्टोबर महिना भारतीय बाजारपेठेसाठी सर्वात वाईट ठरला आहे. विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (एफआयआय) ऑक्टोबर महिन्यात भारतीय शेअर बाजारातून आतापर्यंत एक लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम काढली आहे. 'एफआयआय' ने २५ ऑक्टोबरपर्यंत १,००,२४२.१७ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली आहे. 'एफआयआय'ने या महिन्यात दररोज समभागांची विक्री केली आहे. विश्लेषकांच्या मते, चीनमध्ये उत्तेजक उपायांच्या गडबडीनंतर, 'एफआयआय' सतत आशियाई बाजारातून पैसे काढून घेत आहेत आणि ड्रॅगन मार्केटमध्ये गुंतवणूक करत आहेत. विशेषतः भारतातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले जात आहे. तथापि, भारतीय बाजाराला देशांतर्गत गुंतवणूकदारांकडून सतत पाठिंबा मिळत आहे आणि त्यांनी ऑक्टोबरमध्ये आतापर्यंत ९७,०९०.८३ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत. 'एफआयआय'ने या दिवसांत सर्वाधिक विक्री केली.

भारतीय शेअर बाजार, ज्याला दीर्घकाळ 'ओव्हरव्हॅल्युड' मानले जात होते, तो झपाट्याने घसरत आहे आणि मूळ पातळीवर परतत आहे. 'एफआयआय'कडून महिनाभर सातत्याने होणारी विक्री हेही रुपयाच्या कमजोरीचे प्रमुख कारण आहे. देशातील औद्योगिक उत्पादनाचे मूल्यमापन औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या (आयआयपी) आधारे केले जाते. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने देशातील औद्योगिक उत्पादनाची आकडेवारी जाहीर केली आहे. ऑगस्ट महिन्यात औद्योगिक उत्पादनात घसरण झाली असून, गेल्या २२ महिन्यांत प्रथमच असे घडले आहे. ऑगस्टमध्ये औद्योगिक उत्पादनातील वाढीचा दर उणे ०.१ टक्क्यांवर आला आहे. आधीच्या जुलै महिन्यात त्यात ४.७ टक्के वाढ नोंदविण्यात आली होती. देशाच्या औद्योगिक उत्पादनातील घसरणीमुळे मंदीची चाहूल लागल्याची शंका उपस्थित केली जात आहे.

### सरळ-सरळ

# आज मराठी रंगभूमी दिन...




राजेश राजोरे

9822593903


खऱ्या अर्थाने ही कला जगावी यासाठी लोकाश्रय आणि राजाश्रयाची गरज आहे. वास्तविक आजच्या पिढीला गाजलेल्या नाटकांचा परिचय करुन दिला पाहिजे. आज 'नाटक' पूर्वीसारखे होत नाहीत, प्रतिभावान कलाकार तयार होण्याची 'रंगभूमी' ही पहिली पायरी आहे, असे म्हणण्यापेक्षा याचे पुनरुज्जीवन किंवा पुनरुध्दार कसा होईल? हे पाहण्याची गरज आहे.

**रंगमंच के हम किरदार है सभी,**
**हर रंग मे निखरना पडेगा सभी को।**

महाराष्ट्रात दरवर्षी ५ नोव्हेंबर हा मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो. नवीन पिढीसाठी हा 'थिएटर डे' म्हणता येईल. तर जागतिक रंगभूमी दिन २७ मार्च रोजी साजरा केला जातो. व्यक्ती आणि त्याची संवाद साधण्याची कला यातून सामुदायिक कलाविष्कार याला इंग्रजीत 'थिएटर' आणि मराठीत रंगभूमी हा शब्द वापरतात. तर रंगभूमी, नाट्यसंहिता, नाट्य-दिग्दर्शक, रंगभूषा, वेषभूषा, रंगमंदिर, रंगमंच या सर्व गोष्टी रंगभूमीशी निगडित आहेत.

पूर्वी आजच्यासारखे रंगमंच नव्हते तेव्हा एका मैदानात रंगमंदिर उभारले जात असे. पुढे हळूहळू आजच्यासारखी बंदिस्त रंगमंचाची संकल्पना अस्तित्वात आली. वैदिक काळापासून ते आजच्या कीर्तन परंपरेपर्यंत तसेच कोकणातील दशावतारी नाटके, तमाशा, बहुरुपी, वीरकथा, देवासुर संग्राम तसेच पौराणिक आणि लोककथेच्या रूपातून आजची आधुनिक नाट्यकला जन्मास आली. तर 'नाटक' या कला प्रकाराला मराठी रसिक प्रेक्षकांनी भरभक्कम पाठबळ दिले आणि रंगभूमी बहरली. आद्यनाटककार अश्वघोष, तृतीय रत्नकार महात्मा फुले यांच्या लेखणीतून निर्माण झालेली भारतीय नाट्य परंपरा आजही बहरत आहे, असेही सांगता येईल.

थोर साहित्यीक विष्णूदास भावे यांनी १८१ वर्षापूर्वी १८४३ साली 'सीता स्वयंवर' हे पहिले नाटक सांगली येथे रंगभूमीवर सादर करुन मराठी नाट्यसृष्टिचा पाया घातला. शंभर वर्षानंतर १९४३ साली या घटनेचे स्मरण म्हणून राज्यातील या क्षेत्रातील सर्व नामवंत एकत्र आले होते. सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने ५ नोव्हेंबर रोजी नाट्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्या संमेलनाचे अध्यक्ष थोर स्वातंत्र्यसेनानी व साहित्यीक वि. दा. सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापण्यात आली. चिंतामणराव पटवर्धन यांनी दिलेल्या जागेवर विष्णूदास भावे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने नाट्यमंदिराची कोनशिला बसविण्यात आली. या महत्त्वाच्या क्षणी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करुन हा दिवस जाहीर केला. तेव्हापासून मराठी रंगभूमी दिन राज्यात साजरा केला जातो.

या दिनी सांगलीची अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती १९५९ सालापासून विष्णूदास भावे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मराठी रंगभूमी दीर्घकाळ सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराला 'विष्णूदास भावे गौरवपदक,' देऊन त्यांचा सन्मान करते. आतापर्यंत हा पुरस्कार अमोल पालेकर, केशवराव दाते, ग. दि. माडगूळकर, छोटा गंधर्व, डॉ.जब्बार पटेल, जयंत सावरकर, ज्योत्स्ना भोळे, दाजी भाटवडेकर, दिलीप प्रभावळकर, दुर्गा खोटे, नानासाहेब फाटक, प्रभाकर पणशीकर, पु.श्री. काळे, फैय्याज, बापूराव माने, बालगंधर्व, भालचंद्र पेंढारकर, महेश एलकुंचवार, माधव मनोहर, मामा पेंडसे, मास्टर कृष्णराव, रत्नाकर मतकरी, रामदास कामत, वसंत कानेटकर, विश्राम बेडेकर, शरद तळवलकर, शं.ना. नवरे, हिराबाई बडोदेकर, मोहन जोशी, रोहिणी हट्टंगडी, सतीश आलेकर, सुहासिनी जोशी, प्रशांत दामले, आदिंना मिळाला आहे.

दुसरीकडे जागतिक रंगभूमी दिन हा दरवर्षी २७ मार्च रोजी सन १९६२ पासून साजरा केला जातो. सन १९६१ मध्ये 'युनेस्को' च्या इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिटयूटने या दिवसाची सुरुवात केली होती. या निमित्ताने जगभरातील नाट्य जगतातील महत्वाची एक व्यक्ती संदेश देते. हा युनेस्कोच्या जागतिक रंगभूमी दिनाचा महत्त्वाचा भाग आहे. पहिल्यांदा १९६२ साली ज्यो काफ्चू यांना संदेश देण्याचा पहिला मान मिळाला होता. रंगभूमी दिन नाट्य कलांचे महत्त्व वाढवतो. मनोरंजनाच्या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावतो आणि रंगभूमी जीवनात बदल घडवून आणते. असे अनुभव आहेत. यावर्षी जागतिक रंगभूमी दिनाची थीम 'थिएटर आणि शांततेची संस्कृती' ही होती.

मराठी रंगभूमीचा इतिहास सांगताना १८४३ पूर्वीही रंगभूमी होती आणि तेव्हापासून तर व्यावसायिक रंगभूमी पर्यंतचा प्रवासाचा तसेच लोप पावत असल्याचा अभ्यास करण्याची गरज आहे. खऱ्या अर्थाने ही कला जगावी, आजच्या समस्यांवर नाटके यावीत, यासाठी लोकाश्रय आणि राजाश्रयाची गरज आहे. वास्तविक आजच्या पिढीला गाजलेल्या नाटकांचा परिचय करुन दिला पाहिजे. आज 'नाटक' पूर्वीसारखे होत नाहीत, प्रतिभावान कलाकार तयार होण्याची 'रंगभूमी' ही पहिली पायरी आहे, असे म्हणण्यापेक्षा याचे पुनरुज्जीवन किंवा पुनरुध्दार कसा होईल? हे पाहण्याची गरज आहे. एवढे मात्र खरे!

शेवटी नाट्यकलावंत काळानुरुप उदास झाले आहेत. या आशयाचा एक शेर आठवतो.

**आज मैने कलाकार से पूछा**
**तू मौन क्यों है,**
**कलाकार उदास होकर बोला**
**अब मुझे सुनता कौन है।**

### वर्तमान

# 'वन नेशन वन इलेक्शन'चा निर्णय योग्यच!




प्रा. मधुकर चुटे

9420566404


अलीकडेच लोकसभा निवडणूक प्रचारात मतदारांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सत्तेवर आल्याच्या शंभर दिवसांमध्ये एक देश एक निवडणूक ही कार्यपद्धत स्वीकारण्याच्या शिफारशीला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली. भाजपने हा सर्वात मोठा निर्णय घेऊन अन्य राजकीय पक्षांना दिलेला हा मोठा धक्काच आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात यासंबंधी विधेयक मांडून त्याला कायद्याचे स्वरूप देण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जाण्याची शक्यता दिसते. नरेंद्र मोदी सरकारचा दुसऱ्या टर्मचा कार्यकाळ संपतेवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वन नेशन वन इलेक्शन पद्धत राबवण्याचे संकेत दिले होते आणि त्यानंतर देशभरात याविषयीच्या चर्चेला तोंड फुटले होते. भारतात लोकशाही पद्धत आहे; परंतु वन नेशन वन इलेक्शन करून अमेरिकेप्रमाणे अध्यक्षीय निवडणूक लादण्याचा नरेंद्र मोदी यांचा डाव असू शकतो, अशी टीका विरोधी पक्षांकडून झाली होती. या टीकेकडे फारसे लक्ष न देता नरेंद्र मोदी यांनी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून वन नेशन वन इलेक्शनसाठी शिफारशी मागवल्या होत्या. या समितीमध्ये असलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्यसभेतील माजी विरोधी पक्षनेते गुलाम नबी आझाद, पंधराव्या नीती आयोगाचे अध्यक्ष एन. के. सिंह यांच्यासह नऊ सदस्यांनी पासष्ट बैठका घेतल्या. सोळा भाषांच्या एकशे पाच वृत्तपत्रांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करून लोकांची मते जाणून घेतली. वेबसाइट, ई-मेल आणि पोस्टरद्वारे लोकांच्या प्रतिक्रिया मागवून घेतल्या. चार माजी सरन्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे एक माजी न्यायमूर्ती, उच्च न्यायालयाचे बारा न्यायमूर्ती, चार माजी मुख्य निवडणूक आयुक्त, आठ राज्य निवडणूक आयुक्त, अर्थतज्ज्ञ, राजकीय पक्ष आणि उद्योगांशी चर्चा केली. तेव्हा ४७ राजकीय पक्षांपैकी बत्तीस राजकीय पक्षांनी वन नेशन वन इलेक्शनसाठी पाठिंबा दर्शविला. तर पंधरा राजकीय पक्षांनी विरोध दर्शविला आहे.

लोकसभा आणि घटक राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकांसाठी पहिल्या टप्प्यात ही पद्धत राबवली जाईल असे म्हटले. त्यासाठी देशातील राज्यांचाही पाठिंबा केंद्र सरकारला घेण्याची आवश्यकता आहे. नव्या पद्धतीला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली तर १९५१ ते १९६७ पर्यंत ज्या पद्धतीने लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकत्रित होत होत्या त्याच पद्धतीने निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाईल. अविश्वास प्रस्ताव, त्रिशंकू, बंडखोरी यामुळे जर सरकार कोसळले तर नव्या सरकारचा कालावधी आधीच्या मुदतीच्या काळाएवढाच असेल अशा शिफारशी आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही याच पद्धतीने घेण्याचा भाजपचा प्रस्ताव योग्यच ठरतो. भाजपची संकल्पना अस्तित्वात आली तर आचारसंहिता दीर्घकाळ राहणार नाही. निवडणुकीवर होणारा मोठा खर्च वाचून विकासाला निधी उपलब्ध होऊ शकेल आणि आचारसंहितेमुळे लोकांची कामे खोळंबणार नाहीत. हा निर्णय स्वागतार्ह असला, तरी अनेक प्रश्न यानिमित्ताने अनुत्तरित राहतात.

नागपूर

धुमस

### बंडोबा

युतीची फजिती झाली
झाली आघाडीत बिगाडी भाऊ
बंडखोरांनी आणले
सर्वांच्या नाकीनऊ

प्रयत्न करताहेत अखंड
कसे करावे बंडोबांना थंड?
बघुया कोण माघार घेतो
अन् कोण थोपटतो दंड

तिकीट कापून ज्यांना
दिला गेला डच्चू
तेच आता पान ठेवून
देतो म्हणतात गच्चू

आजवर दखल घेतली नाही
विचारले नाही हालहवाल
आम्ही त्यांचे का ऐकावे?
बंडखोर विचारतात हाच सवाल

एकमेकांच्या विरोधात
सोयऱ्यांसंगे सगे पाहावे
म्हणून जे जे होईल ते ते पाहावे
आपण फक्त उगे राहावे

निवडणुकीच्या आखाड्यात
उतरलेत हल्ली बंडोबा
बघुया त्यांच्या डावपेचात
कुणाचा होतो खेळखंडोबा

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

### संवाद

## गटारे स्वच्छ करण्यासाठी नवीन उपाययोजना कराव्यात!

गटारात उतरून काम करणाऱ्या कामगारांचा आत तयार झालेल्या विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू होण्याच्या घटना भारतात यापूर्वी अनेकदा घडल्या आहेत. आजही घडत आहेत. 'विकसित भारत' च्या सगळ्या कल्पना आणि स्वप्ने गुंडाळून ठेवणाऱ्या या घटनांमुळे खरे तर आपली मान शरमेने खाली गेली आहे. असले काम करणारे लोक समाजाच्या कनिष्ठ थरातील असल्यामुळे त्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी कोणीही मेणबत्या घेऊन मूक मिरवणूक काढत नाही की त्यांच्यासाठी कधी न्याय मागितला जात नाही. आजच्या काळात तंत्रज्ञानाने मोठी झेप घेतलेली आहे. अशा परिस्थितीत गटारे स्वच्छ करण्यासाठी माणसांचा वापर न करता अन्य उपाययोजना करण्याचा काहीतरी मार्ग निघू शकेल इतकी प्रगती नक्कीच झालेली आहे. गटारे स्वच्छ करण्यासारखे धोकादायक काम करणाऱ्या कामगारांसाठी सुरक्षेच्या साधनसामुग्रीची तरतूद



न होणे हे कंत्राटदार त्यासाठी पुरेसा पैसा देण्यास नाखूष असल्याचेच द्योतक आहे. अशा प्रकरणी पोलिस गुन्हे दाखल करतातही; पण निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल एखादी व्यक्ती दोषी ठरल्याचे आजवर पाहण्यात आलेले नाही.

**अनिल रा. तोरणे**
तळेगाव दाभाडेः ४१०५०७
जि.: पुणे , मो.नं.: ९२२६१६०६५४

### वाचक विचार मंच

## मतदान वाढवा--देश घडवा!

भारतीय लोकशाही शासन प्रणालीत मतदानाला खूप महत्त्व आहे. देशातील प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क प्रामाणिकपणे व निःपक्षपातीपणे प्रत्येक निवडणुकीत बजावलाच पाहिजे तरच देश घडेल. देशाच्या विकास, उन्नती व सर्वांगीण प्रगतीसाठी योग्य व पात्र लोकप्रतिनिधी निवडल्या जातील. मतदानाची टक्केवारी पन्नास-पंचावन्नच्या पुढे जात नाही,

पन्नास टक्के मतदार मतदान करीत नाहीत त्यामुळे, योग्य व पात्र, तसेच दूरदृष्टी असलेले, राष्ट्र विकास व उन्नतीसाठी प्रामाणिकता जपणारे लोकप्रतिनिधी निवडून येत नाही. निवडून येण्यासाठी सर्व प्रकारचे मार्ग उमेदवार अंमलात आणतात त्यामुळे या सर्व प्रकारच्या आमिषाला बळी पडणारे मतदार मतदान करतात, त्यांनाही उमेदवारांशी काही घेणे-देणे नसते. उमेदवार कसा का असेना आपले त्यांच्या देवाण-घेवानीने भागले एवढेच निकस मतदार लावतो व आमिषाला बळी पडून मतदान करतो, यामुळे खरे लोकशाही मानणारे, प्रामाणिक, राष्ट्रनिष्ठा, विकासाचा ध्यास असलेले लोकप्रतिनिधी निवडून येत नाही. पर्यायाने जो विकास हवा तो होत नाही. मतदानाची टक्केवारी पन्नास-पंचावन्न असते याचा अर्थ अर्ध्या मतदानावर लोकप्रतिनिधी निवडून येतात ही खरी लोकशाही शासन प्रणाली नव्हे! मतदानाची टक्केवारी ९५-१०० टक्के झाली तर लोकशाही शासन प्रणालीला अपेक्षित मतदान असेल व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला घटनात्मक मतदान अधिकार मिळाल्याचे सार्थक होईल.

**धोंडीरामसिंह ध. राजपूत**
वैजापूर, जि. छ.संभाजी नगर
मो.नं.- ९४२१३१२२४४

### गुल्लेर

# कधी चालली?




नरेंद्र इंगळे

9561226572


'यंदा आठ दिवस जाईन मायच्या घरी..'

'पंधरा दिवस जाय..'

'पंधरा काहून? आठच दिवस जाईन भाऊबीजले..'

'मी पंधरा दिवस यासाठी म्हनतो की तुले आराम भेटते.. घरी धंदा करून तुही कंबर दुखते..'

'तुम्ही सैपाक करसान काय पंधरा दिवस?'

'माहा मी पाहून घेईन..'

'जेवसान कुठी?'

'मले कोनी दोन भाकरी टाकून देते..'

'जनाबुढीले टाकाले लावजा..'

'तिले दिसत नाही..'

'मंग कोनाले टाकाले लावता?'

'कोनी येते हातभार लायाले..'

'त्या शशिकलाले बलाऊ नका..'

'काहून?'

'जेवढं सांगतलं तेवढं करत जा..'

'ते मस्त भाकरी टाकते.. भाजी चांगली करते.. बलावलं की येते..'

'काही कामच नाही.. तिचा इतिहास भूगोल ठाऊक नाही काय तुमाले?'

'आपून ते इचारत नसतो..'

'इतके साधे राहृत जाऊ नका.. घेईन ते गेरात तुमाले..'

'नाही नाही.. तू बिनफिकर जाय.. मस्त लाडू करंज्या खाय.. पंधरा सोडून तीन हप्ते राह्यली तरी चालते..'

'मले भयानी समजता काय? चारच दिवस राहीन मी..'

'कधी चालली?'

'तुमाले काहून घाई झाली?'

'तूच जातो-जातो करून राह्यली.'

'आजून लाडू कराचे राह्यले.. मी अथून लाडू घेऊन चालली माह्या भावासाठी.. त्याले माह्या हातचे तुपाचे लाडू लय आवडतात.'

'लाडू केले होते त्यारोजी.'

'ते खलास झाले.'

'बापा.. डबाभर लाडू कोनं खाल्ले?'

'वाटघाट करा लागत नाही काय? कोनं आपल्या घरी आनलं त्याले द्या लागते.'

'बरं.. आज घेऊन येतो अदीक तूप.. लाडू घेऊन जाय तुह्या भावासाठी.. जाशील तर पह्यल्या गाडीनं जाय.'

'काहून?'

'उशीर केला की एसटीवर गर्दी होते.. सकाळी रिकामी जाते गाडी.. लागन तर तुले डेपोत सोडून देईल.'

'तुम्ही काहून घाई करुन राह्यले?'

'तुह्याच गोठ काढली जायाची.. म्हनून म्हनतो की जायाचं असलं तर लवकर जाय'.

'पाहीन वक्तावर..जाईन तं जाईन नाहीतर जाणार नाही..'

# २५ नोव्हेंबरपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली :** १८ व्या लोकसभेचे पहिले हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. वन नेशन-वन इलेक्शन आणि वक्फ विधेयकासह अनेक महत्त्वाची विधेयके या अधिवेशनात मांडली जाऊ शकतात. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा प्रस्तावही या अधिवेशनात मंजूर होऊ शकतो. संविधानाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी संसदेचे संयुक्त अधिवेशन संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित केले जाऊ शकते. काँग्रेससह विरोधी पक्ष वन नेशन-वन इलेक्शनला विरोध करत असल्यामुळे हिवाळी अधिवेशनात गदारोळ होण्याची शक्यता आहे.



**वृंदावन :** येथील प्रसिद्ध बांके बिहारी मंदिरात दररोज कृष्ण भक्तांची वर्दळ असते, या मंदिरात येणारे भाविक हत्तीच्या तोंडातून आलेले पाणी पीत आहेत. त्यांना वाटतं की हे पाणी कृष्णाच्या पायातून येत आहे पण ते कृष्णाच्या पायातून नाही तर एसी मधून पाणी येत असल्याचा खुलासा व्लॉगरने केला आहे.

# अमेरिकेने भारताला दिला धक्का

## जेटसाठी इंजिनचा पुरवठा २०२५ ला

**मॉस्को :** अमेरिकेने रशिया आणि गुरपतवंत सिंग पन्नू यावरून सुरू असलेल्या द्विपक्षीय तणावादरम्यान तेजस लढाऊ विमानाबाबत भारताला पुन्हा एकदा मोठा धक्का दिला आहे. अमेरिकेच्या जीई एरोस्पेस कंपनीने आता भारताच्या स्वदेशी तेजस एमके १ए फायटर जेटसाठी इंजिनचा पुरवठा २०२५ पर्यंत पुढे ढकलला आहे. यामुळे भारतीय हवाई दलाच्या आधुनिकीकरण कार्यक्रमाला मोठा धक्का बसला आहे.

तेही एकीकडे भारतीय मिग-२१ विमाने निवृत्त होत असताना आणि दुसरीकडे चीनपासून पाकिस्तानपर्यंत मोठ्या प्रमाणावर आधुनिक लढाऊ विमाने त्यांच्या हवाई दलात समाविष्ट केली जात असताना अमेरिकेने भारताला हा दणका दिला. मात्र, अमेरिकेच्या फसवणुकी दरम्यान, मित्र रशियाने भारताला आपल्या नवीन आणि अत्याधुनिक सुखोई विमानांसाठी मोठी ऑफर दिली आहे.

# कंपन्यांवरील बंदीनंतर भारताचा हस्तक्षेप

वृत्तसंस्था

## रशियाला मदत केल्याचा ठपका

**नवी दिल्ली :** रशियासोबतच्या संबंधांमुळे अमेरिकेने अनेक भारतीय कंपन्यांवर बंदी घातली आहे. यावर भारत सरकारने हस्तक्षेप करत या कंपन्या भारताच्या नियमांचे उल्लंघन करत नसल्याचे स्पष्ट केले. वरिष्ठ पातळीवरील अधिकारी या मुद्यावर अमेरिकन अधिकाऱ्यांशी चर्चा करत असल्याचेही सरकारने म्हटले आहे. युक्रेन युद्धात रशियाला मदत केल्याच्या आरोपावरून अमेरिकेने जगभरातील शेकडो कंपन्यांवर बंदी घातली आहे. यामध्ये १९ भारतीय कंपन्यांचाही समावेश आहे. या कंपन्यांनी रशियाला तंत्रज्ञान आणि उपकरणे पुरवल्यामुळे रशियाची लष्करी ताकद वाढल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे.

# थेट युकेतून आला अन् पोलिसांनी पकडला

## संशयित प्लॅसिड विमानतळावरून ताब्यात

**वास्को :** वेर्णा येथे २०१५ साली पोलिसांना शिवीगाळ करून मारहाण करणारा व गुन्हा दाखल झाल्यावर न्यायालयात उपस्थित न राहिलेल्या प्लॅसिड डिकॉस्टा याला रविवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी यूकेहून मोपा विमानतळावर उतरल्यावर ताब्यात घेण्यात आले. यानंतर त्याला वेर्णा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आल्यावर रितसर अटक करण्यात आली.

२३ डिसेंबर २०१५ रोजी दुपारी ३.३० वाजता वेर्णा येथील गोवन महाराजा हॉटेलसमोर अपघात झाला होता. या प्रकरणी तत्कालीन पोलीस शिपाई मुजावेद खान व इतर पोलीस पंचनामा करण्यासाठी गेले होते. तेथे संशयित डिकॉस्टा याने त्या पोलिसांना शिवीगाळ केली. तसेच कामामध्ये अडथळा आणून मारहाण केली.

# बस वाहकाकडून मुलीवर लैंगिक अत्याचार

**पणजी :** दक्षिण महाराष्ट्रातील १७ वर्षीय मुलीवर खासगी बस वाहकाने लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आगशी पोलिसांनी दक्षिण महाराष्ट्रातील खासगी बस वाहकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सदर घटना दक्षिण महाराष्ट्रातील असल्यामुळे सिंधुदुर्ग पोलिसांकडे गुन्हा वर्ग करण्यात आला आहे.

## आगशी पोलिसांकडून गुन्हा दाखल

आगशी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एका महाविद्यालयात शिकणारी १७ वर्षीय मुलगी आजारी असल्यामुळे तिला उत्तर गोव्यातील इस्पितळात दाखल करण्यात आले होते. तिथे उपचार सुरू असताना तिचे समुपदेशन करण्यात आले.

# प्रत्येक जिल्ह्यात एक महिलास्नेही ग्रामपंचायत

**नवी दिल्ली :** तळागाळापासूनच विकासयोजनांमध्ये प्रत्येक घटकाची भागीदारी सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्नशील मोदी सरकारचा जोर महिलांच्या कल्याणावर आहे. याच उद्देशासोबत ग्रामपंचायत विकास योजना निर्माण करण्यापासून महिला सभा अणि बाल-बालिका सभांना अनिवार्य करण्यात आले आहे. आता देशातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक ग्रामपंचायत महिलास्नेही ग्रामपंचायत म्हणून विकसित करण्याची केंद्र सरकारची इच्छा आहे.

पंचायत राज मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना हे लक्ष्य सोपविले आहे. आता त्यांना या दिशेने कशाप्रकारे काम करावे याकरता ४-६ नोव्हेंबरपर्यंत पुण्यात एक राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित होणार असून यात देशभरातील पंचायतींचे अधिकारी-प्रतिनिधी सामील होणार आहेत. महिलांना सुरक्षित आणि अनुकूल वातावरण देण्यासाठी सर्वप्रथम देशातील प्रत्येक जिलह्यात कमीतकमी एक ग्रामपंचायतीला महिलास्नेही करत त्याला उदाहरणाच्या स्वरुपात सादर केले जाणार आहे.



महिलास्नेही पंचायत निरंतर विकासाच्या ९ लक्ष्यांमध्ये देखील सामील आहे. महिलास्नेही ग्रामपंचायत कशी निर्माण करावी याचे प्रशिक्षण देण्यासाठी राज्यांना सांगण्यात आले आहे. राज्य ग्रामीण विकास आणि पंचायतराज संस्था, राज्य पंचायत राज प्रशिक्षण संस्थांकडून सदस्य आणि अन्य प्रतिनिधींचे नामांकन केले जाणार आहे. पुण्यातील यशवंतराव चव्हाण अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये ४-६ नोव्हेंबरपर्यंत प्रशिक्षण देत संबंधितांना मास्टर ट्रेनरचे स्वरुप दिले जाणार आहे. हे मास्टर ट्रेनर पंचायतींच्या अन्य प्रतिनिधींनाही प्रशिक्षित करतील आणि मॉडेल वुमन फ्रेंडली ग्राम पंचायतीचे नेतृत्व करतील.

# मंदिराबाहेर बटोगे तो कटोगेची घोषणाबाजी

**ब्रॅम्प्टन :** कॅनडातील ब्रॅम्प्टन येथील हिंदू सभा मंदिराजवळ खलिस्तानी अतिरेक्यांच्या निदर्शनाला हिंसक वळण लागले. या दरम्यान खलिस्तानी अतिरेक्यांनी मंदिरातील भाविकांवर हल्ला केला. या हल्ल्यांनंतर हिंदूंनी मंदिराबाहेर निदर्शने केली. यावेळी मंदिराच्या पुजाऱ्याने, हा हल्ला कॅनडात राहणाऱ्या हिंदू समुदायावर नाही तर संपूर्ण जगातील हिंदूंवर आहे, कॅनडाच्या मंदिराबाहेर यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या घोषणांची पुनरावृत्ती करत त्यांनी, बंटोगे तो कटोगे असे म्हटले. हरियाणा विधानसभा निवडणुकीदरम्यान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी हा नारा दिला होता.

कॅनडातील ओटावामध्ये

## हिंदूंवर लाठीचार्ज, पाठलाग करून मारहाण



भारतीय उच्चायुक्तांनी एक निवेदन जारी करून खलिस्तानी अतिरेक्यांनी ब्रॅम्प्टनमधील हिंदू सभा मंदिरावर केलेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध केला. आम्ही आज (३ नोव्हेंबर) टोरंटोजवळील ब्रॅम्प्टन येथील हिंदू सभा मंदिराच्या संयोगाने आयोजित कॉन्सुलेट कॅम्पच्या बाहेर भारतविरोधी घटकांद्वारे हिंसक व्यत्यय पाहिला, ओटावा येथील भारतीय उच्चायुक्तांनी अधिकृत निवेदनात म्हटले आहे. आमच्या वाणिज्य दूतावासाने स्थानिक सह-आयोजकांच्या पूर्ण सहकार्याने आयोजित केलेल्या नियमित वाणिज्य दूतावासाच्या कार्यात अशा प्रकारचा व्यत्यय निर्माण होत आहे हे पाहणे अत्यंत निराशाजनक आहे. आम्ही भारतीय नागरिक 'आम्ही देखील अत्यंत निराशाजनक आहोत. अर्जदारांच्या सुरक्षेची काळजी. तत्पूर्वी, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनीही या हल्ल्याचा निषेध केला आणि प्रत्येक कॅनेडियनला आपला धर्म मुक्तपणे आणि सुरक्षितपणे आचरणात आणण्याचा अधिकार आहे, असे ट्रूडो यांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे की हिंसा अस्वीकार्य आहे.



## जम्मू-काश्मीर विधानसभेत पीडीपी आमदाराने मांडला प्रस्ताव

# कलम ३७० वरून प्रचंड गदारोळ

वृत्तसंस्था

**जम्मू :** जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पाच दिवस अधिवेशनाला आज (दि. ४) प्रारंभ झाला. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याला विशेष दर्जा बहाल करणारे कलम ३७० पुनर्संचयित करण्याचा प्रस्ताव पीडीपीच्या आमदार वाहिद पारा यांनी मांडला. या प्रस्तावाला भाजपच्या आमदारांनी तीव्र निषेध केला. यानंतर विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला.

जम्मू-काश्मीर विधानसभेत पीडीपीचे आमदार वाहिद पारा यांनी कलम ३७० मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला. जम्मू-काश्मीरला पुन्हा एकदा विशेष राज्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. विधानसभेत या प्रस्तावावरून भाजप आणि पीडीपी आमदारांमध्ये जोरदार वादावादी झाली. वाहिद पारा हे जम्मू-काश्मीरच्या पुलवामा मतदारसंघाचे आमदार आहेत. त्यांच्या या मागणीला त्यांच्या सहकारी आमदारांनीही पाठिंबा दिला होता.

कलम ३७० मागे घेण्याच्या पीडीपी आमदार वाहिद पारा यांच्या प्रस्तावाला भाजपने उघड विरोध केला. वाहिद पारा यांच्या प्रस्तावाच्या विरोधात भाजपचे सर्व २८ आमदार उभे राहिले आणि त्यांनी या प्रस्तावाला विरोध केला. यामुळे सभागृहात प्रचंड गदारोळ झाला.

## भाजप आमदारांनी केली निलंबनाची मागणी

वाहिद पारा यांनी असा प्रस्ताव आणून सभागृहाच्या नियमांचे उल्लंघन केले असल्याने त्यांना निलंबित करावे, अशी मागणी भाजपचे आमदार लाल शर्मा यांनी केली आहे. मात्र, यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष अब्दुल रहीम राथेर यांनी आमदारांना शांत राहण्याचे आवाहन केले. हा प्रस्ताव अद्याप माझ्याकडे आलेला नाही, असे सभापती अब्दुल रहीम राथेर यांनी म्हटले आहे. ते वाचूनच कोणताही निर्णय घेतला जाईल. भाजप आमदारांच्या निषेधादरम्यान नॅशनल कॉन्फरन्सचे आमदारही वेलमध्ये आले आणि त्यांनी भाजप आमदारांवर सभागृहाचे कामकाज व्यत्यय आणल्याचा आरोप केला. यामुळे काही काळ सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

# माझ्या लोकांना माझ्यावर विश्वास आहे!

## रोहित पाटलांचे संजयकाका पाटलांना प्रत्युत्तर

**सांगली :** विधानसभा निवडणुकीपूर्वीच सांगलीत राजकारण तापल्याचे पाहायला मिळाले. दिवाळीनिमित्त रोहित पाटलांचे कार्यकर्ते फराळाच्या बॉक्समधून तीन हजार रुपये वाटत असताना रंगेहाथ पकडण्यात आल्याचा दावा माजी खासदार संजयकाका पाटील यांनी केला आहे. यावर आता रोहित पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

रोहित पाटील म्हणाले, काल तासगावमधील घटनेत माझे नाव घेण्यासाठी पराकोटीचे दडपण संबंधित व्यक्तीवर टाकले याची माहिती आम्हाला मिळाली. तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात



अशापद्धतीचा प्रकार संजयकाका पहिल्यांदा करत नाही. ते कुठल्या पातळीला जातील हे लोकांना माहीत आहे आणि माझ्या लोकांना माझ्यावर विश्वास आहे. पाच वर्षे काम करणाऱ्याला अशा गोष्टी करायची गरज नसते. मी पाच वर्षे काम केले आहे हे लोकांना माहीत आहे. अशा पद्धतीने बदनामीचे राजकारण कोण करत आहे हे लोकांना माहीत आहे लोक त्यांना उत्तर देतील, असे प्रत्युत्तर रोहित पाटील यांनी माजी खासदार संजयकाका पाटील यांना दिले. तत्पूर्वी संजय काका पाटील म्हणाले, अतिशय निंदनीय प्रकार असून मला कार्यकर्त्यांकडून फोनद्वारे माहिती मिळाली आहे. उद्या-परवा मी तुम्हाला याबाबत पुराव्यानिशी माहिती देईन.

# कॉन्झर्वेटिव्ह पक्षाच्या नेतेपदी केमी बेडेनॉच; पहिल्या अश्वेत नेत्या ठरल्या

देशोन्नती वृत्तसंकलन

**लंडन :** ब्रिटनमध्ये १४ वर्षांपर्यंत सत्तेवर राहिल्यावर निवडणुकीत पराभव पत्करावा लागलेल्या कॉन्झर्वेटिव्ह पार्टीने आता पुन्हा स्वतःला संघटित करण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. याची सुरुवात नेतृत्व परिवर्तनाने करण्यात आली आहे. कॉन्झर्वेटिव्ह पार्टीने केमी बेडेनॉच यांची स्वतःच्या नेतेपदी निवड केली आहे. बेडेनॉच यांनी दक्षिण मध्यममार्गी पक्षाच्या जवळपास १ लाख सदस्यांकडून करण्यात आलेल्या मतदानात विरोधी उमेदवार खासदार रॉबर्ट जेनरिक यांच्यावर मात केली आहे. कुठल्याही प्रमुख ब्रिटिश राजकीय पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या अश्वेत महिला आहेत.

बेडेनॉच यांनी ऋषी सुनक यांची जागा घेतली आहे. सुनक यांच्या नेतृत्वातच जुलै महिन्यात कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा मोठा पराभव झाला होता. कॉन्झर्वेटिव्ह पार्टीला केवळ १२१ जागांवर समाधान मानावे लागले होते.



१८३२ नंतरचा या पक्षाचा हा सर्वात मोठा पराभव ठरला होता.

पक्षाला पुन्हा प्रतिष्ठा मिळवून देणे, अर्थव्यवस्था आणि स्थलांतरितांसह प्रमुख मुद्यांवर लेबर पार्टीचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या धोरणातील त्रुटी समोर आणणे आणि २०२९ मध्ये होणाऱ्या पुढील निवडणुकीत कॉन्झर्वेटिव्ह पार्टीला सत्तेवर आणण्याचे आव्हान नव्या नेत्यावर असणार आहे.

यापूर्वी ऋषी सुनक यांनी बुधवारी ब्रिटनच्या संसदेत विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला होता. सुनक हे जुलै महिन्यात सार्वत्रिक निवडणुकीतील कॉन्झर्वेटिव्ह पार्टीच्या पराभवानंतर नव्या नेत्याची निवड होईपर्यंत पक्षाचे अंतरिम नेते म्हणून कार्यरत होते.

# प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शकाचा मृतदेह आढळला

## दुर्गंधीमुळे घटना आली उघडकीस

**बंगळुरू:** प्रसिद्ध कन्नड चित्रपट दिग्दर्शक गुरुप्रसाद बंगळुरू येथील त्याच्या फ्लॅटमध्ये मृतावस्थेत आढळला. रविवारी ३ नोव्हेंबर रोजी त्याचा मृतदेह घरात पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळल्याने एकच खळबळ उडाली. त्याने दोन-तीन दिवसांपूर्वीच आत्महत्या केली असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. गुरुप्रसाद मागील आठ महिन्यांपासून उत्तर बंगळुरूमधील मदननायकनहल्ली भागातील एका अपार्टमेंटमध्ये राहत होता. शेजाऱ्यांना त्याच्या फ्लॅटमधून दुर्गंधी आल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. गुरुप्रसादचे आर्थिक नुकसान झाले होते. तसेच त्याचा रंगनायक चित्रपटही फ्लॉप ठरल्याने तो नैराश्यात होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुप्रसादचा फ्लॅटमधील पंख्याला कुजलेल्या अवस्थेत मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळून आला.



**सोलापूर :** रस्त्यांवरून ये-जा करताना अनेक वाहने फॅन्सी नंबरप्लेट लावून बिनधास्तपणे फिरतात. याशिवाय अनेक वाहनचालक पूर्वीचे मूळ सायलेन्सर बदलून मोठ्या आवाजाचे मॉडिफाइड सायलेन्सर लावतात. अशा प्रत्येक वाहनाला वाहतूक पोलिसांनी कारवाई करीत १ कोटी ३८ लाख रुपयांचा दंड वसूल केला.

# मंत्री सुरेश गोपींविरोधात केरळमध्ये एफआयआर

**तिरुअनंतपुरम :** केरळ पोलिसांनी केंद्रीय राज्यमंत्री सुरेश गोपी यांच्या विरोधात रुग्णवाहिकेचा दुरुपयोगाच्या आरोपाप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे. पुरम महोत्सवात गोंधळ झाल्याचे कळताच सुरेश गोपी हे रुग्णवाहिकेतून तेथे पोहोचले होते असा आरोप आहे. त्रिशूर पोलिसांनी त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदविला आहे.

# २५ हायप्रोफाईल जुगाऱ्यांना मध्य

**जबलपूर :** मध्य प्रदेशमधील जबलपूरमध्ये एका फार्म हाऊसवर टाकलेल्या धाडीत २५ हायप्रोफाईल जुगाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. छाप्यात ५ लाख ७२ हजार ऊपये, मोबाईल फोन आणि आलिशान कारही जप्त करण्यात आल्या आहेत. जबलपूरचे पोलीस अधीक्षक संपत उपाध्याय यांच्या आदेशावरून झालेल्या या कारवाईने मध्य प्रदेशातील राजकारणही चांगलेच तापले आहे.

# दिल्ली ठरले जगातील सर्वात प्रदूषित शहर

## हवेची गुणवत्ता 'अत्यंत खराब'

**नवी दिल्ली:** दिवाळीच्या आसपासच्या दिवसात फटक्यांच्या धुरामुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाबाबत कायम बोलले जाते, पण सध्या दिल्लीने मात्र याबाबतचे सगळे विक्रम मोडले आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, रविवारी दिल्लीची हवेची गुणवत्ता 'अत्यंत खराब' श्रेणीमध्ये नोंदवण्यात आली, या दिवशी हवा गुणवत्ता निर्देशांक (ँघ) ३८२ वर पोहोचला.

या श्रेणीमुळे दिल्लीतील हवेचा दर्जा आता अत्यंत खराबवरुन गंभीर स्थितीमध्ये पोहोचण्याच्या पातळीवर पोहोचला आहे.

# चेन पुलिंगमुळे लोकलच्या वेगाला ब्रेक!

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई :** दररोज घरातून बाहेर पडल्यावर सुरू होणारा धक्काबुक्कीचा प्रवास, लोकलमध्ये होणारी प्रचंड गर्दी, उशिरा धावणाऱ्या लोकल, प्रवाशांची वाढती संख्या यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या वाढत्या गर्दीमुळे वैतागलेल्या प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे पाहायला मिळत

रेल्वे वेळेत धावावी आणि रेल्वे सेवेत सुधारणा व्हावी, यासाठी रेल्वेकडून अनेक प्रयत्न केल्याचे पाहायला मिळते. देखभालीची कामे, आपत्कालीन ब्लॉक, ओव्हरहेड वायर तुटणे, ट्रेस पासिंग आणि एकाच परिसरात अनेक ट्रेन खोळंबून राहणे यामुळे लोकलचे वेळापत्रक बिघडत आहे. तसेच साखळी ओढण्याच्या घटनेमुळे मेल एक्स्प्रेसचे वेळापत्रकदेखील कोलमडत असल्याचे समोर येत आहे.

## मेल-एक्स्प्रेस अन् लोकलचे प्रवासी हैराण

जेव्हा साखळी ओढली जाते, त्यानंतर वाहतूक पूर्व पदावर येण्यासाठी कमीत कमी १५ ते २० मिनिटे लागतात. त्यामुळे त्या कालावधीमध्ये त्या एक्स्प्रेसच्या मागे असलेल्या सुमारे पाच ते सहा लोकलला उशीर होतो, त्यामुळे त्यांचे वेळापत्रक कोलमडते. त्यामुळे प्रवाशांना विनाकारण आपत्कालीन चेन ओढण्यापासून रोखण्यासाठी त्यांच्याकडून दंडवसुली करण्यात येते तसेच त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाईदेखील करण्यात येत आहे.

आहे. त्यातच मध्य रेल्वेकडून एक माहिती देण्यात आली आहे. या वर्षाच्या एप्रिल ते सप्टेंबर महिन्यात मध्य रेल्वेच्या मेल एक्स्प्रेस

## चेन पुलिंग एक समस्या

गाड्यांमध्ये चेन पुलिंगच्या ८२३ घटनांची नोंद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ही संख्या कमी असली तरी अशा घटनांमुळे मेल-एक्स्प्रेससोबतच लोकलच्या वेळापत्रकावरही परिणाम होत आहे. त्यामुळे विनाकारण कोणीही चेन पुलिंग करू नये, असे आवाहन रेल्वेकडून करण्यात आले आहे.

# पोलीस कॉन्स्टेबलकडून मणिपुरात सहकाऱ्याची हत्या

**इंफाळ :** मणिपूर पोलीस दलातील एका कॉन्स्टेबलने एका वरिष्ठ सहाय्यक उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यावर शाब्दिक वादानंतर गोळ्या घालून ठार केले. अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, कॉन्स्टेबल विक्रमजीतसिंग यांनी आपल्या सर्व्हिस रायफलमधून सब-इन्स्पेक्टर शाहजहान यांच्यावर गोळ्या झाडल्या. या गोळीबारात ते जागीच ठार झाले.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा...
पुण्यभूमी

# मौलाना आझाद महामंडळ सातशे कोटींवर नेले

## आ.इद्रिस नायकवडी — परळीत राष्ट्रवादीचा मेळावा



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष इतर दोन पक्षांसोबत सत्तेत गेला म्हणून आपल्या समाजाची दिशाभूल केली जात आहे. मुळात अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडवण्याची धमक आणि काम करण्याचा नेक इरादा हा अजितदादा पवारांमध्ये आहे हे विरोधकांना सुद्धा माहित आहे. म्हणूनच मागच्या अर्थसंकल्पात मोलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे बजेट तीस कोटींवरून वाढवून अजितदादांनी ७०० कोटींवर नेऊन दाखवले हे सत्य समाजाला समजले पाहिजे, असे मत राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा विधानपरिषद सदस्य आ.इद्रिस नायकवडी यांनी परळी येथील मेळाव्यात बोलताना व्यक्त केले आहे.

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील व्हीआयपी फंक्शन हॉल येथे आ.इद्रिस नायकवडी यांच्या प्रमुख उपस्थितीत अल्पसंख्यांक समाजाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास परळी शहरासह तालुक्यातील मुस्लिम समाज बांधव, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार तसेच धनंजय मुंडे साहेब यांच्या नेतृत्वात आम्ही काम करत असताना विशाल गडाच्या घटनेपासून ते मीरा भाईंदरच्या घटनेपर्यंत दादांच्या कामाची तत्परता आम्ही पाहिली आहे अल्पसंख्यांक समाजासाठी कायम धावून येण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे लोकसभेत काय घडले याचा विचार न करता आता विधानसभा निवडणुकीत मात्र समाज बांधवांनी संपूर्णपणे धनंजय मुंडे सारख्या नेत्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे असेही श्री नाईकवाडी पुढे बोलताना म्हणाले.

समाजाच्या विकासासाठी विविध ठिकाणी शादीखाने, तसेच रस्ते, पाणी यांसारख्या विविध योजना आणि घरकुलांच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी नेहमीच समाजासाठी प्राधान्याने काम केलेले आहे. आगामी काळात शहरांमध्ये एक भव्य शादीखाना व महिलांसाठी स्वतंत्र हॉल उभारणे त्याचबरोबर शहरातील चारही कब्रस्तानांचे सुशोभीकरण करून त्या ठिकाणी चार प्रार्थना हॉल उभारण्याचा संकल्प धनंजय मुंडे यांनी केला असून आगामी काळात तेही कामे पूर्ण केली जातील, असा विश्वास यावेळी प्रास्ताविकपर भाषणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी व्यक्त केला.

यावेळी मंचावर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, अयुब भाई पठाण, शकील कुरेशी, अजित कच्छी, राजा खान, जाफर खान, तकी खान, अन्वर अली, सिराज अहमद, गफार काकर, जमील अध्यक्ष, शकील कच्छी यांसह अनेक मान्यवर पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# केजमध्ये नेते झिजवू लागले उंबरठे!

**रणधुमाळी:**नमिता लोखंडेला जनता घरी बसविणार



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या राज्यात निवडणुकीचे वारे वेगाने वाहताना दिसून येत आहे जो तो आपल्या पक्षाचा प्रचार पोट तिडकीने करताना दिसत आहे यात केज विधानसभा मतदारसंघात सध्या सत्ताधारी असलेल्या आमदार नमिता मुंदडा या सुद्धा गरजेपेक्षा जास्त फिरताना दिसून येत आहेत.थंडीच्या दिवसात राजकीय वातावरण गरम झाले असून जो तो आपापल्या परीने प्रचारात मग्न असल्याचे दिसून येत आहे यात केज विधानसभा मतदारसंघात महायुती कडून निवडणूक लढत असलेल्या चालू आमदार नमिता मुंदडा यादेखील आपल्या विजयासाठी फिरताना दिसून येत आहे आमदार झाल्यापासून आपल्या गाडीची काच खाली न करणारे मतदारसंघात कधीमधी येणाऱ्या नमिता मुंदडा आता आपल्या सासऱ्यांनी मतदारसंघात अनेक विकास कामे अडवलेले असल्यामुळे अनेकांचा निधी परत पाठवल्यामुळे छोट्या मोठ्या गोष्टींचा विषय मंत्रालयापर्यंत नेल्यामुळे नमिता मुंदडा आता चक्क प्रचारासाठी रस्त्याने फिरताना दिसून येत आहे पाच वर्ष मतदार संघात यायचं नाही लोकांच्या सुखदुखात जायचं नाही आणि निवडणूक लागली की मतदार संघात यायचं आणि केज तालुक्यातील काही विनाकारण पत्रकारावर खोटे गुन्हे दाखल करणे प्रत्येकाच्या दारोदारी जाऊन मत मागायचं हे किती पर्यंत योग्य आहे असा सवाल आता मतदार विचारत आहे त्यामुळे येणाऱ्या काळात नमिता यांचा पराभव शंभर टक्के आहे यात मात्र शंका नाही.

# केजमध्ये एकाच घरात दिली पदे

**चर्चा:** काँग्रेसची स्वास्थ अतिशय दयनिय



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची बीड जिल्ह्याची काँग्रेसची दयनीय अवस्था झाली आहे. देशपातळीवरील काँग्रेस पक्षाला या विधानसभा निवडणूकीत बीड जिल्ह्यात एक ही जागा मिळाली नाही. गांधी परिवाराच्या अगदी जवळचे म्हणजे किचन कॅबिनेट मधील खासदार सौ.रजनीताई पाटील यांच्या खासदार निधी व जिल्हा नियोजन समितीचा निधीचा अर्धा वाटा घेणारे श्री. राजेसाहेब देशमुख यांनी ही काँग्रेसची अवस्था पाहुन काँग्रेस ला रामराम ठोकून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात ऐनवेळी प्रवेश करुन परळी विधानसभेची उमेदवारी मिळवून पाटलाच्या काँग्रेसला हात दाखवित तुतारी हातात घेतली. काँग्रेस च्या जिल्हाध्यक्षानेच काँग्रेस सोडल्या नंतर खासदार रजनीताई चे स्वीय सहायक म्हणून घेणारे राहूल सोनवणे यांना जिल्हाध्यक्ष केले वआता उरली सुरली काँग्रेस सारणीच्या सोनवणे यांच्या दावणीला बांधुन काँग्रेसचे अस्तित्व लयास घालवली जात आहे. काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा प्रभारी अध्यक्ष राहुल सोनवणे, बीड जिल्हा काँग्रेस मिडीया प्रमूख संतोष सोनवणे, केज तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष सुजित सोनवणे या एकाच घरात काँग्रेस पक्षाचे पद देऊन या पदासाठी इतर कोणीही लायक विश्वासू नसल्याचे पक्षश्रेष्ठीला दाखवुन दिले,का खरेच यांच्या शिवाय बीड जिल्ह्यात काँग्रेस ला नेता कार्यकर्ताच शिल्लक राहीला नाही?खा.सौ.रजनीताई पाटील यांचा खासदार निधी व जिल्हा नियोजन समितीचा निधी राहुल सोनवणे यांनीच विकासासाठी घेऊन इतर कोणावर ही विश्वास नसल्याचे आत्ता पर्यंत दाखवून दिले. हेच राहुल सोनवणे यांचे मेव्हणे किरण पाटील शिक्षक मतदार संघात काँग्रेस पक्षाला रामराम ठोकुन भाजपात प्रवेश केला व मराठवाडा शिक्षक मतदार संघातुन भाजपचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवली त्या वेळेस निवडणुकीत बीड जिल्ह्याची अख्खी काँग्रेस टिम राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली किरण पाटलांचा प्रचार करित होती त्याच राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात भाजपाच्या बी टीमचे नेतृत्व करणारे राहूल सोनवणे व त्यांचे काँग्रेसचे पदाधिकारी बंधू हे बीड जिल्हा काँग्रेसचे एकनिष्ठ शिलेदार बनले. आहेत या दोन चार डोक्या शिवाय काँग्रेस कडे नेता, पदाधिकारी, कार्यकर्ताच पान २ वर...

# धम्म प्रबोधन प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**धम्म:**शांतीदुत फाउंडेशन भिक्खु संघाचे आयोजन



पुणे/पुण्यभुमी प्रतिनिधी

शांतीदूत फाउंडेशन भिक्खू संघ यांच्या विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन ट्रस्ट येथे भन्ते धम्मानंद यांनी आयोजित केलेले तीन दिवशीय धम्म प्रबोधन प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न झाले.या शिबिराचे उद्घाटन भदंत नागघोष महाथेरो यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भंते पञ्ञारक्खित यांनी भूषविले. बुद्धिस्ट सेमिनरीचे संचालक मुख्य प्रशिक्षक भदंत धम्मसार यांनी बौद्ध जीवन मार्ग, प्रतीत्यसमुत्पाद, आधुनिक बुद्ध डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिपादलेला साधा सोपा आचरण योग्य फंडामेंटल बुद्धिझम या विषयावर मूलभूत मार्गदर्शन केले

भदंत धम्मधर, भंते सिद्धनाग,भंते धम्मप्रकाश, भंते सचिन बोधी यांनी समायोजित धम्मदेस्सना दिली. बुद्धिस्ट सेमिनरीचे समन्वयक सत्येंद्र तेलतुंबडे यांनी मुक्ती कोण पथे?, जातीभेद निर्मूलन, धम्मक्रांती, अधोगती कडे जाणारी शिक्षण व्यवस्था, आदर्शाभिमूख आणि आदर्श हीन समाजाची अवस्था यावर प्रबोधन केले. धम्म शिबिरात पुणे शहरातील विविध उपनगरातील आबाल वृद्ध, उपासक उपासिकांनी नियमित उपस्थिती व सहभाग नोंदवला समारोप प्रसंगी करूणादिपा आर्याजी आणि त्यांचा श्रामनेरी संघ उपस्थित होता. यामध्ये वैशालीताई अहिरे, मीनाताई मेढे, हौसाताई जगधने, मंदाताई लहाने, शकुंतला जाधव, खरे ताई यां श्रामनेरी सहसह मनीषा ब्राह्मणे ,छायाताई ब्राह्मणे धम्मसेविका इत्यादी श्रामनेरी उपस्थित होत्या. समारोपात देव,भूत अंगात का येते ? उपसोथ कसे करावे? बौद्ध संस्कृतीचा इतिहास कोणता? इत्यादी प्रश्नावर धम्मसार भदंत यांनी समर्पक उत्तरे दिली. दररोज सकाळी आदर्शांचे पूजन, एकाग्रता सराव , वंदना सूत्र पठण घेण्यात आले. याप्रसंगी कांबळे साहेब छाया वाघमारे आधुनिक धम्मगीते म्हटले रवींद्र दिवस डॉक्टर अर्चना नितीन गवळी प्रियंका कांबळे सी एल इंगळे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी बौद्ध जनांच्या बावीस प्रतिज्ञा, धम्म अंगीकारण्याच्या प्रतिज्ञा आणि सराणत्तय होऊन शिबिर समापन करण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी सागर वानखेडे यांनी विशेष परिश्रम घेतले शिबिराचे संयोजन व सूत्रसंचालन भन्तेजी धम्मानंद यांनी केले.

# केज मतदार संघात भलतीच चर्चा!

**पडघम:**डॉ.अंजली घाडगेंच्या विषयी प्रश्नचिन्ह



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

डॉ.अंजलीताई घाडगे या केज विधानसभा निवडणुकीत राशप पक्षाकडून उमेदवारी मिळावी म्हणून इच्छुक होत्या. त्यांनी त्यासाठी जोरदार तयारी देखील केली होती. सर्व मतदारसंघ पिंजून काढत मतदारसंघातून संपर्क वाढवला होता. पक्षाच्या काही कार्यक्रम व सामाजिक उपक्रमातून त्यांनी अग्रेसर होत मतदारांशी व कार्यकर्ते यांच्याशी जवळीक साधली होती. राशप कडून उमेदवारी त्यांनाच मिळेल अशी खात्री झाली होती. तशी मागणी देखील वाढली होती. परंतु पक्षाने पुन्हा निष्ठावतांचा नारा देत मा. आ. पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी जाहीर केली यावेळी डॉ. अंजलीताई घाडगे यांनी कुठलेही आढेवेढे न घेता आपला उमेदवारी अर्ज दाखल न करता पक्षाने दिलेल्या उमेदवार यांच्या सोबत राहुन काम करण्याचा अंतिम निर्णय घेतला. त्यांच्या या भुमिकेमुळे त्या केज मतदारसंघात अधिकच लोकप्रिय झाल्या असल्याचे दिसून येत आहे. आगामी काळात त्यांना त्यांच्या या भुमिकेचा फायदा होईलच पण राशप चे उमेदवार पृथ्वीराज साठे यांनाही त्यांचा मोठा फायदा होईल असे राजकीय जाणकारांचे म्हणने आहे.

# आरोपीचा जामीन झाला मंजूर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



आरोपी योगेश राऊत यांने फिर्यादी अविनाश श्रावणे यास जुन्या भांडणाची कुरापत काढून जीवे मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे ,आरोपावरून शहर पोलीस स्टेशन माजलगाव येथे आरोपी योगेश राऊत विरुद्ध गु.र.न.२४२/२०२४ कलम ३०७,३२६,३२४,३२३,५०७ अन्वे गुन्हा दाखल झाला होता सदर गुन्ह्यात आरोपीस अटक झाल्यानंतर त्यास न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले त्यानंतर आरोपीचे वतीने ड.अर्जुन आडे यांनी नियमित जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला सदर अर्जाच्या अनुषंगाने ड आडे यांचा प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव यांनी आरोपीस जामीन मंजूर केला त्यांना ड दत्ता आडे यांनी सहकार्य केले.

**बीड:** येथील जिल्हा न्यायालय आवारात अ‍ॅड. सुरक्षा जावळे यांना, वाढदिवसा निमित्ताने मंगल कामना देतांना, बीड जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. अविनाश गंडले, अ‍ॅड. इम्रान पटेल,अ‍ॅड. सदानंद राऊत, अ‍ॅड. शेख राजा भैय्या,अ‍ॅड. विशाल वडमारे,अ‍ॅड. बप्पा माने, अ‍ॅड. किरण मस्के,अ‍ॅड. राजाभाऊ बनसोडे,अ‍ॅड. राजेश शिंदे आदी.



# संभाजी मुंडेंचे ऱ्हदयविकाराने निधन



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील अयोध्या नगर येथील संभाजी पाटलोबा मुंडे (वय–७०) यांचे सोमवारी (ता.४) रात्री ९:०० वाजण्याच्या सुमारास ऱ्हदयविकाराच्या तीव्र झटक्याने राहत्या घरी निधन झाले.

औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील सेवानिवृत्त कर्मचारी संभाजी पाटलोबा मुंडे (एस पी मुंडे) कर्मचारी महासंघाचे केंद्रीय कमेटी सदस्य होते. डी एस यांचे ते वडील होते. त्यांनी विज निर्मिती केंद्रातील कर्मचारी वर्गासाठी भरीव काम केले आहे. त्यांचा धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात वावर होता. त्यांनी त्यांच्या पत्नीला पंचायत समितीवर १९९२ साली निवडुण आणले होते. संभाजी मुंडे यांच्या पार्थिवावर मंगळवारी (ता.५) सकाळी ९:०० वाजता परळी येथील सार्वजनिक स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राख सावडण्याचा विधी बुधवारी सकाळी ७:३० आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

## खा.बजरंग सोनवणे — परळीमध्ये परिवर्तन अटळ

# लोकांच्या मनात अन्यायाविरुद्ध चीड



परळी /पुण्यभूमी प्रतिनिधी

अन्यायाविरुद्ध आपणाला लढायचंय आणि या लढाईत सत्याचा विजय झाला पाहिजे . लोकांच्या मनातील अन्याविरुद्धची जी चीड आहे ती विरोधकांना मतदानातून दाखवण्यासाठी सर्वांनी कामाला लागावे व राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केले.

ते परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता व बुथ प्रमुखांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना बोलत होते. तर ९ नोव्हेंबर रोजी परळी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या होणाऱ्या विराट सभेने माझ्या विजयावर शिक्कामोर्तब होईल असा आत्मविश्वास राजेसाहेब देशमुख यांनी व्यक्त केला. शहरातील बालाजी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता व बुथ प्रमुखांच्या बैठकीत खासदार बजरंग बप्पा सोनवणे पुढे बोलताना म्हणाले की,बुथवर यंत्रणा सक्षम ठेवा.लोकसभेला जे बोगस मतदान झाले ते आता होऊ देऊ नका. विधानसभेत आपले १८० पेक्षा जास्त आमदार निवडून येणार आहेत. त्यामुळे चिंता करण्याचे अजिबात कारण नाही.आमचा उमेदवार १९९२ पासून राजकारणात आहे.लढवय्याआहे.सक्षम आहे.काम करणारा आहे.आणि तुमच्या मागे भक्कम खासदार उभा आहे.समोरचा उमेदवार २००२ पासून राजकारणात आहे.. रेल्वेचे अपूर्ण काम मीच पूर्ण करणार आहे.प्रत्येकाने सकाळी साडेसहा वाजता बुथवर जा आणि मतदान झाल्यावर सायंकाळी ७ वाजता बुथ सोडा. लोकसभेसारखा काही गोंधळ झाला तर एक फोन करा दुसऱ्या मिनिटाला मी केंद्रांवर येतो.इथून पुढे आपलेच सरकार येणार आहे.परळीचा श्वास मोकळा झाला पाहिजे. तर याप्रसंगी बोलताना महाविकास आघाडीचे उमेदवार पान २ वर...

# परळीमध्ये एकाच व्यक्तीकडे तीन पिस्टन?

**मोहीम:** गोपनीय माहिती मिळताच पोलिसांची कारवाई



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत जसा जसा प्रचाराचा धडाका वाढत चालला तस शहरात गुन्हेगारी वर तोंड करताना दिसून येत असून यातच परळी शहरात ३ गावठी पोस्टल आणि जिवंत काडतुसे बाळगणारा युवकास परळी शहर पोलिसांनी जेरबंद केले. गावठी पिस्टल विरोधात पोलिसांनी यापूर्वी देखील अनेक कारवाया करत गुन्हे दाखल केले मात्र शहरात युवकांना हे पिस्टल मिळतात कसे? हा प्रश्न अद्याप ही अनुत्तरित आहे.

मिळालेल्या माहितीनुसार परळी शहरातील जुन्या परळी मधील गणेशपार भागात असलेल्या काळरात्री मंदिर पाठीमागे एक ३० वर्षीय युवक तीन गावठी पिस्टल आणि ६ जिवंत काडतुसे बाळगून असल्याच्या माहिती वरून शहर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्यास ताब्यात घेतले असता त्याच्याकडे ३ गावठी पिस्टल आणि कारतूस ६ ती ज्याची अंदाजे किंमत १ लाख ५६ हजार एवढी आहे. वैभव रोहीदास घोडके (वय ३० वर्ष रा. भिमनगर ) असे ताब्यात घेतलेल्या युवकाचे नाव आहे पुढील तपास परळी शहर पोलीस करीत आहे.